नेमणे आहे
नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी तसेच न्यूज चॅनलकरिता प्रतिनिधी नेमणे आहेत.
१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड
संपर्क:- ८८९६७११७११
jantaawajnews@gmail.com

दैनिक
# जनता आवाज

साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्
पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.
सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल
सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534
अमोल सिताराम थोरात पा. 9764626533
ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु।।
राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु।। 9765481334

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १६९ | बुधवार, दि. २० ऑगस्ट २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

## संमिश्र

### आशिया कपसाठी भारतीय संघाची घोषणा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** टी-२० आशिया कपसाठी भारतीय क्रिकेट संघाची घोषणा करण्यात आली आहे. मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनी मंगळवारी संघाची घोषणा केली. सूर्यकुमार यादव संघाचे नेतृत्व करेल, तर भारतीय कसोटी संघाचा कर्णधार शुभमन गिललाही स्थान मिळाले आहे.

क्रिकेट आशिया कप ९ सप्टेंबरपासून यूएईमध्ये सुरू होत आहे. भारत या स्पर्धेचे यजमान आहे. टीम इंडियाचा पहिला सामना १० सप्टेंबर रोजी यूएईविरुद्ध असेल.

### बसला भीषण आग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे :** पुणे शहरात मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावर नऱ्हे परिसरात प्रवासी वाहतूक करणाऱ्या एका बसला भीषण आग लागली. या आगीत बस पूर्णपणे जळून खाक झाली आहे. बसमधील ३० वर सर्व प्रवासी वेळीच बाहेर पडल्याने मोठी दुर्घटना टळली असून सुदैवाने या घटनेत कुणीही जखमी झाले नाही, अशी माहिती पोलिसांनी दिली. बाह्यवळण मार्गावरून सोमवारी मध्यरात्री २ वाजण्याच्या सुमारास प्रवासी बस जात होती.

# राहुल गांधी 'सिरियल लायर?'

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची खोचक टीका

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई : आता लोकनीती-सिएसडीएसच्या आकडेवारीवर अकांडतांडव करणारे राहुल गांधी माफी मागतील का? हा प्रश्न आहे. मात्र राहुल गांधी यांच्याकडून अशी मला अजिबात अपेक्षा नाही. राहुल गांधी एकप्रकारे 'सिरियल लायर' आहेत. ज्या प्रमाणे सिरियल किलर असतात त्याप्रमाणे ते 'सिरियल लायर' आहेत. त्यामुळे ते तेच खोटे रोज बोलतील. तसेच परत-परत तिच खोटी आकडेवारी मांडतील. याविषयी माझ्या मनात शंका नाही. मात्र जनतेसमोर आज सत्य स्पष्ट झाले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.**



महाराष्ट्रातील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांतील मतदार संख्येतील फरकाबाबत मोठा वाद निर्माण झाल्यानंतर अखेर लोकनीती-सिएसडीएस या नामांकित सर्वेक्षण संस्थेने माघार घेतली आहे. मतदार संख्या तुलना करताना संस्थेकडून गंभीर घोडचूक झाल्याचे स्पष्ट झाले असून, याची कबुली संस्थेचे सह-संचालक संजय कुमार यांनी स्वतः दिली आहे. त्यासाठी त्यांनी माफी देखील मागितली आहे. मात्र, आता राहुल गांधी माफी मागतील का? असा प्रश्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित केला आहे.

या संबंधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, लोकनीती-सिएसडीएस या सर्वेक्षण संस्थेने माघार घेतली आहे. त्यांनी जो डेटा दिला होता आणि ज्या डेटा वर आधारित इलेक्शन कमिशनवर राहुल गांधी यांनी आरोप केले होते. तसेच आमच्या सरकारला देखील आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले होते. त्याच आज लोकनीती-सिएसडीएसने या संदर्भात ट्वीट करून आमचे आकडे चुकीचे होते म्हणत माफी मागितली आहे. तसेच त्यांनी त्यांचे आकडे परत घेतले आहे.

सामाजिक आणि राजकीय शास्त्र क्षेत्रात काम करणारे लोकनीती-सिएसडीएसचे प्राध्यापक संजय कुमार यांनी महाराष्ट्र निवडणुकीसंदर्भात एक्स वर केलेली पान ४

## ... आता रोजगार निर्मिती होणार

### महाराष्ट्रात ४२,८९२ कोटींची गुंतवणूक; देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत १० सामंजस्य करार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** महाराष्ट्र डेटा सेंटर कॅपिटल आणि सौरऊर्जा एकत्रीकरण कॅपिटल म्हणून पुढे येत आहे. अनेक कंपन्या या क्षेत्रांत येत असून उत्पादन क्षेत्रातही मोठी क्रांती घडणार आहे. यूकेसोबत झालेल्या रणनीतिक करारामुळे नवे दरवाजे उघडले असून भारतात अधिक गुंतवणूक होत आहे. हे गुंतवणूकदारांचा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावरील विश्वासाचे द्योतक आहे. आज विविध गुंतवणुकींसाठी महत्त्वपूर्ण असे आठ सामंजस्य करार आणि दोन रणनीतिक करार करण्यात आले असून, त्यातून राज्यात तब्बल ४२ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होऊन २८ हजारांपेक्षा जास्त रोजगार निर्मिती होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थित आज मंत्रालयातील समिती कक्षात १० सामंजस्य करारांचे आदानप्रदान पान ४

# पावसाने लाखो एकर क्षेत्र पाण्याखाली

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माहिती

**जनता आवाज वृत्तसेवा**



**मुंबई :** मागील २ दिवसांपासून राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे राज्यातील लाखो एकरचे क्षेत्र पाण्याखाली गेल्याची माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंगळवारी पत्रकारांना दिली. नुकसानग्रस्त भागात दोन दिवसांत पंचनामे सुरू होतील, असे ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल मंत्रालयातील राज्य आपत्कालीन नियंत्रण कक्षात जाऊन मुंबई शहर व परिसरासह राज्यातील इतर भागांत कोसळणाऱ्या पावसामुळे उद्भवलेल्या स्थितीची पान ४

### ... प्रशासनाशी आमचा संपर्क सुरू

आपत्ती व्यवस्थापन मंत्रालयही सज्ज आहे. सर्व अधिकारी २४ तास कार्यालयात हजर आहेत. राज्य सरकार ३६ जिल्ह्यांवरही बारकाईने लक्ष आहेत. तेथील प्रशासनाशी आमचा संपर्क सुरू आहे. काही ठिकाणी दुर्घटना घडल्या आहेत. त्याची आकडेवारी लवकरच समजेल. काही जिल्ह्यांत जनावरे वाहून गेलेत. रत्नागिरी, रायगड जिल्ह्यातील ३-४ नद्या आहेत, विशेषतः खेड, चिपळूण येथील पाणीपातळी वाढत आहे.

# शिंदे-शिरसाटांच्या खिशात कोट्यवधींचा मलिदा

## बिवलकर प्रकरणात संजय राऊतांचा घणाघात

**जनता आवाज वृत्तसेवा**



**मुंबई :** ५० हजार कोटींच्या भूखंड घोटाळ्याचा मलिदा शिंदे- शिरसाटांच्या खिशात गेला, त्यातील २० हजार कोटींचा वाटा त्यांनी घेतला तर १० हजार कोटी थेट दिल्लीतील बॉस कडे गेले, असा गंभीर आरोप शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खा. संजय राऊत यांनी केला आहे.

वनखात्याच्या मालकीची ५ हजार एकर जमीन एका बिवलकर नावाच्या व्यक्तीला देण्यासाठी सिडकोच्या अध्यक्ष पद संजय शिरसाट यांना देण्यात आले. ५ हजार एकराचा भूखंड एकनाथ शिंदे आणि संजय शिरसाट यांनी बिवलकर नावाच्या व्यक्तीला दिला ज्याचा यावर अधिकारच नाही. मुंबई-रायगडमधील जमिनींचे भाव पाहिले तर ५० हजार कोटी रुपयांचा हा व्यवहार पान ४

### अनेकांना समज देऊन सोडले : राऊत

खुन्याला वाचवण्याचा प्रयत्न न्यायालयच करत असेल. माणिकराव कोकाटे आरोपी नाही का? कोकाटे गुन्हेगार असताना केवळ खाते बदल करण्यात आला. ज्याला फाशी व्हायला पाहिजे त्यांची बदली करण्यात आली. अनेकांना समज देऊन सोडण्यात आले, असेही संजय राऊत यांनी सांगितले.




# मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री अलर्टवर

## तात्काळ मदतीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यात १४ लाख एकर पिकांचे नुकसान झाले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे. राज्यात अनेक भागांमध्ये अतिवृष्टी झाली असल्याचे देखील त्यांनी सांगितले. राज्यातील १२ ते १४ लाख एकर वरील शेती बाधित झाली असल्याचे ते म्हणाले. राज्यात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र राज्यातील परिस्थिती बऱ्यापैकी नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न सुरु आहे. मुंबईतील मिठी नदी धोका पातळीवर गेली असल्यामुळे सुरुवातीच्या काळात अनेकांना वाचवण्यासाठी प्रयत्नकरावे लागले असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

अलीकडच्या काळात राज्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडणार असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील स्वतः मिठी नदीवर जाऊन पाहणी करत आहेत.

# कीर्तनकारांनी कुणाचीही बाजू घेऊन बोलू नये

## माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे पत्रकार परिषदेतून कीर्तनकारांना आवाहन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** आपण वारकरी संप्रदायातील आहोत. या वारकरी संप्रदायातील जे कीर्तनकार असतात, त्याला आपण हभप म्हणतो. त्यांनी स्थानिक राजकारणावर भाष्य करू नये. कुणाचीही बाजू घेऊन बोलू नये. राज्यघटनेतील मुलभूत तत्वांना ठेच पोहोचेल असे कोणतेही विधान कीर्तनकारांनी करू नये. कारण, ही राज्यघटना आपल्या संतांच्या विचारांतूनच तयार झाली आहे. त्यामुळे यासंबंधी बोलताना पथ्य पाळले पाहिजे, असे मत माजी मंत्री व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केले.



कीर्तनकार संग्राम बापू भंडारे यांनी बाळासाहेब थोरात यांना कथितपणे जीवे मारण्याची धमकी दिली आहे. थोरात यांनी मंगळवारी आयोजित एका पत्रकार परिषदेद्वारे या धमकीवर भाष्य केले.

माजी मंत्री थोरात म्हणाले की, देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांना स्वतःचा राजकीय पक्ष काढण्याचा सल्ला दिला आहे. देशाचे निवडणूक आयुक्त एखाद्या राजकीय पक्षाच्या नेत्यासारखे बोलत आहेत. त्यांची बोलण्याची पद्धत पाहता ते जनतेसाठी काम करतात असे वाटत नाही. त्यामुळे त्यांनी स्वतःचा राजकीय पक्ष काढावा, असे ते म्हणालेत. दरम्यान, मी गांधी नाही, पण विचारांसाठी बलिदान स्वीकारण्याची माझी तयारी आहे, असेही ते यावेळी कीर्तनकारक संग्राम पान ४

### उद्या भव्य विराट मोर्चा होणार

बाळासाहेब थोरात यांना धमकी देणाऱ्या तथाकथित कीर्तनकार संग्राम भंडारे यांच्या निषेधार्थ व संगमनेरमध्ये अशांतता निर्माण करणाऱ्या जातीयवादी शक्ती विरोधात तमाम संगमनेरकर हिंदू समाज, विविध पुरोगामी संघटना, अध्यात्मिक मंच, महाविकास आघाडी यांच्या वतीने उद्या, गुरुवार दि. २१ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९ वाजता भव्य विराट मोर्चा होणार असल्याची माहिती काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अजय फटांगरे व विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी दिली आहे.

# दूध दरवाढीसह भेसळीविरोधात लंके आक्रमक

## शेतकरी आणि ग्राहकांशी निगडीत प्रश्नांवर संसदेत आंदोलन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** दूध हे शेतकऱ्यांसाठी केवळ उत्पादन नसून जोडधंदा आणि जीवन जगण्याचा अविभाज्य घटक आहे. मात्र आज दुधाला योग्य भाव मिळत नाही, उत्पादन खर्चापेक्षा कमी दराने विक्री करावी लागत आहे. दुसरीकडे दुधात भेसळ करणारे लोक सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याशी थेट खेळ करत आहेत.



या शेतकरी आणि ग्राहकांशी निगडित प्रश्नांवर इंडिया आघाडीच्या पान ४

> शेतकऱ्यांच्या न्यायासाठी व सर्वसामान्यांच्या आरोग्यासाठी हा लढा आहे. दुधाला बाजारभाव नसल्याने दूध उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात आहेत. महाराष्ट्रात दुधाला प्रतिलिटर ४० ते ४२ रुपये उत्पादन खर्च येतो. याचा विचार करून दूध उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित दर मिळाले पाहिजे. दुधामध्ये मोठ्या प्रमाणात भेसळ होत असून, भेसळीमुळे विशेषतः लहान मुलांना गंभीर आजारांना सामोरे जावे लागत आहे. दुधामध्ये भेसळ करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करून त्यांना कठोर शासन झाले पाहिजे.
>
> **– नीलेश लंके, खासदार**

# पूरस्थितीला सरकार जबाबदार

## उद्धव ठाकरे यांचा आरोप

**जनता आवाज वृत्तसेवा**



**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुंबईसह राज्यातील पूरस्थितीला सरकार जबाबदार असल्याचा आरोप केला आहे. नांदेड जिल्ह्यातील ११ गावांत जी आपत्ती आली, ती नैसर्गिक नव्हे तर मानवनिर्मित आहे. तेथील गावकऱ्यांचे योग्य पद्धतीने पुनर्वसन केले असते तर कुणावरही जीव गमावण्याची वेळ आली नसती, असे त्यांनी म्हटले आहे.

नांदेड येथील शेतकरी कामगार पक्षाचे दिवंगत नेते केशवराव धोंडगे यांचे सुपुत्र पुरुषोत्तम धोंडगे यांनी आज शिवसेना ठाकरे गटात प्रवेश केला. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या हातात शिवबंधन बांधले. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे यांनी मुंबईसह पान ४

# जनतेचा पाठिंबा हीच माझी खरी ताकद

## आ. आशुतोष काळे; दीड कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** कोपरगाव शहराचा सर्वांगीण विकास हि केवळ राजकीय जबाबदारी नव्हे, तर एक भावनिक बांधिलकी पण आहे. कोपरगाव मतदार संघाबरोबरच कोपरगाव शहराचा विकास साधण्यासाठी मला मिळालेला जनतेचा पाठिंबा, विश्वास आणि सहकार्य हीच माझी खरी ताकद आहे. तुमच्या विश्वासावरच मला कोपरगावचा चेहरा-मोहरा बदलवता आला. कोपरगावचा विकास योग्य दिशेने सुरु असून जनता समाधानी आहे. कोपरगावच्या पान ४



> कोपरगाव शहराचा चेहरा-मोहरा बदलण्यासाठी गेल्या काही वर्षांमध्ये राबवलेली विकासकामे ही जनतेच्या विश्वासातून आणि सहकार्यामुळेच शक्य झाली आहेत. शहरातील नागरिकांनी विकासाची दिशा ओळखून वेळोवेळी सहकार्य केल्यामुळे कोपरगाव शहर जिल्ह्यात एक प्रगतशील शहर म्हणून कोपरगाव शहर पुढे येत आहे.
>
> **– आशुतोष काळे, आमदार**

# राजकीय अपयशातून यशाकडे : डॉ. विखेंचा नवा प्रवास



**जनता आवाज वृत्तसेवा**

लोकसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर अनेकांनी असा तर्क लावला होता की, डॉ. सुजय विखे पाटील यांची राजकीय कारकीर्द आता संपुष्टात येईल. परंतु हे अनुमान पूर्णपणे चुकीचे ठरले. कारण पराभवानंतरही खचून न जाता, त्यांनी नव्या जोमाने राजकारणात उडी घेतली आणि आज ते अहिल्यानगर जिल्ह्यातील एक प्रभावी राजकीय चेहरा म्हणून उभे राहत आहेत.

अपयश आलं तरी संयम बाळगून, परिस्थितीचं भान ठेवत आणि भावनिक नव्हे, तर प्रगल्भ राजकारण करत त्यांनी आपली वाटचाल सुरू ठेवली. त्यांनी जिल्ह्यातील कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधायला सुरुवात केली. कार्यक्रमांच्या निमित्ताने गावोगावी फिरून जनतेच्या अडचणी समजून घेतल्या आणि त्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील राहिले.



याच डावपेचातून त्यांनी पारनेर, नेवासा, संगमनेर आणि राहुरी विधानसभा मतदारसंघांमध्ये महायुतीला विजय मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

त्यांच्या संयोजकतेमुळे महायुतीला जिल्ह्यात मोठे यश मिळाले आहे. डॉ. सुजय विखे यांची कार्यशैली ही केवळ विकासकामांवर केंद्रित नाही, तर ती माणसांशी संपर्क आणि संघटन बांधणीवरही लक्ष केंद्रित करते. मतदारांना काय हवे आहे, हे समजून घेत त्यांनी त्यांच्यासाठी योजनांची आखणी केली.

प्रत्येक गावात कार्यकर्त्यांशी संवाद साधण्याचा त्यांनी घेतलेला निर्णय, आज त्यांच्या नेतृत्वाचा खरा पाया बनत आहे. नुकत्याच झालेल्या पारनेर दूध संघाच्या निवडणुकीत डॉ. विखे यांच्या नेतृत्वाखालील पॅनलने स्पष्ट बहुमत मिळवत मोठा विजय मिळवला. ही केवळ सहकारी संस्थेतील निवडणूक नसून, जिल्ह्यातील राजकीय समीकरणांवर परिणाम करणारा निकाल ठरला आहे.

डॉ. विखे पाटील यांच्या दूरदृष्टीपूर्ण डावपेचामुळे हा विजय शक्य झाला. आज जिल्ह्यातील तरुणांमध्ये डॉ. सुजय विखे पाटील हे एक लोकप्रिय नाव बनले आहे. कार्यक्रमांमध्ये त्यांच्याभोवती सेल्फी घेण्यासाठी होणारी गर्दी ही फक्त प्रसिद्धी नव्हे, तर एक भावनिक जोड दर्शवते. तरुणांना समजून घेणे, त्यांच्याशी थेट संवाद साधणं आणि त्यांच्या अडचणींवर तत्काळ कृती करणे यामुळेच त्यांची तरुणांमध्ये पकड वाढलेली आहे.

डॉ. विखे पाटील यांनी आता लक्ष स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे वळवले आहे. त्यांनी सध्या मोर्चेबांधणी सुरू केली असून, गावपातळीवर कार्यकर्त्यांना एकत्र करून मजबूत संघटन उभारण्यावर भर दिला आहे. त्यांच्या रणनीतीमुळे भाजप व महायुतीला आगामी निवडणुकांत मोठे यश मिळविणार, हे नक्की.

# कचरा टाकाऊ वस्तू न राहता बायोगॅसचे साधन ठरणार

## खा. निलेश लंके; नैतिक फाऊंडेशनच्या माध्यमातून स्वच्छता अभियान मोहिमेला प्रारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : कचऱ्यातूनही उर्जेचा स्त्रोत निर्माण होऊ शकतो, ही बाब या प्रकल्पातून सिद्ध होत आहे. कचरा टाकाऊ वस्तू न राहता बायोगॅस निर्मितीचे साधन ठरणार आहे. हा प्रकल्प स्वच्छ शहर, ऊर्जावान शहर या ध्येयाकडे टाकलेले महत्त्वाचे पाऊल ठरत असल्याचे प्रतिपादन खासदार निलेश लंके यांनी केले.

कचरा मुक्त शहर होण्याचा संकल्प घेऊन आणि कचऱ्यापासून बायोगॅस तयार करण्याच्या उद्देशाने नैतिक फाऊंडेशनच्या माध्यमातून स्वच्छता अभियान मोहिमेला नुकतेच प्रारंभ करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रशांत अरविंद दरेकर यांच्या संकल्पनेतून व पुढाकारातून ही मोहिम राबविण्यात येणार असून या अभियानाचे उद्घाटन खा. लंके यांच्या हस्ते झाले.




यावेळी माजी महापौर अभिषेक कळमकर, माजी नगरसेवक योगीराज गाडे, उद्योजक अल्ताफ शेख, शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब गुंड, महेश घावटे आदी मान्यवर उपस्थित होते.

फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रशांत दरेकर म्हणाले की, कचरा मुक्त शहर घडविण्यासाठी कचऱ्याचे योग्य संकलन आणि नियोजनबद्ध निचरा होणे आवश्यक आहे. ही जबाबदारी फक्त पालिकेची नसून प्रत्येक नागरिकाने आपले कर्तव्य समजून पुढे यायला हवे. कर्तव्याच्या भावनेतूनच नैतिक फाऊंडेशनने ही मोहीम राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

फाऊंडेशनच्या माध्यमातून घराघरातून ओला व सुका कचरा वेगळा करून त्याचे व्यवस्थापन केले जाईल. यामुळे शहरात स्वच्छता तर होईलच, पण नवी ऊर्जा निर्मितीही घडणार असल्याची माहिती दरेकर यांनी दिली.

नैतिक फाऊंडेशनच्या माध्यमातून विविध भागात कचरा गाड्या पाठवून दैनंदिन कचरा वर्गीकृत स्वरूपात संकलित केला जाणार आहे. गोळा केलेल्या ओल्या कचऱ्यापासून बायोगॅस निर्मिती केली जाईल तर सुक्या कचऱ्याचे वेगळे व्यवस्थापन होईल.या अभियानात नागरिकांना सक्रियपणे सहभागी करून घेण्यात येणार आहे. प्रत्येक घरातून ओला व सुका कचरा वेगळा करण्यासाठी फाऊंडेशनच्या माध्यमातून कार्य केले जाणार आहे.

> स्वच्छता अभियानाची ही सुरुवात लोकसहभागाशिवाय पूर्ण होऊ शकणार नाही, यासाठी सर्वांचा सहभाग महत्त्वाचा आहे. या प्रकल्पामुळे घरगुती व औद्योगिक वापरासाठी स्वस्त इंधन उपलब्ध होईल. शेतकऱ्यांना सेंद्रिय खत मिळेल, प्रदूषणात घट होईल आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे शहरात स्वच्छ व निरोगी वातावरण तयार होईल. नैतिक फाऊंडेशनचा हा उपक्रम शहराच्या आरोग्य आणि स्वच्छतेसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.
>
> **– निलेश लंके, खासदार**

# समाजाचा विकास हा एकमेव उद्देश असावा

## माजी मंत्री बबनराव घोलप; राष्ट्रीय चर्मकार महासंघाचा संवाद मेळावा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : समाजाला जोडून पुढे घेऊन जाणे हीच खरी समाजसेवा आहे. वैचारिक मतभेद बाजूला ठेवून एकजुटीने समाजाला पुढे नेणे ही काळाची गरज आहे. समाजाचा विकास हा सर्वांचा एकमेव उद्देश असला पाहिजे आणि त्यासाठी एकच दिशा ठरवून काम करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी मंत्री बबनराव घोलप यांनी केले.

नगर शहरातील हॉटेल पॅराडाईज येथे राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा




आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात अध्यक्षीय भाषणात घोलप बोलत होते.

यावेळी माजी आ. भाऊसाहेब कांबळे, ज्ञानेश्वर कांबळे, माधवराव गायकवाड, डॉ. शांताराम कारंडे, दत्तात्रय गोतीसे, राजेंद्र बुंदिले, दिलीप कानडे, अनिल कानडे, शोभाताई कानडे, बाळासाहेब केदारे, माणिकराव नवसुपे, कैलासराव गांगर्डे, चंद्रकांत नेटके, विठ्ठलराव जयकर, बाबासाहेब लोहकरे, रोहिदास उदमले, रामकिसन साळवे मेजर, प्रा. संजय कानडे, पोपट बोरुडे आदी उपस्थित होते.

या मेळाव्यात चर्मकार संघर्ष समितीचे संस्थापक अध्यक्ष शिवाजी साळवे यांनी कार्यकर्त्यांसह राष्ट्रीय चर्मकार महासंघात प्रवेश केला. माजी मंत्री बबनराव घोलप यांनी साळवे यांची राज्य कार्याध्यक्षपदी नियुक्ती जाहीर केली.

प्रास्ताविक राजेंद्र बुंदिले यांनी करुन संघटनेच्या सामाजिक कार्याचा आढावा घेतला. मेळाव्याचे आयोजन जिल्हाध्यक्ष बाळासाहेब केदारे व माणिकराव नवसुपे यांनी केले होते.

> वैचारिक वादाने समाजाचे नुकसान न करता विकासासाठी सर्वांनी एकत्र यावे. महासंघाच्या वतीने राज्य सरकारकडे संत रविदास विश्वविद्यापीठ स्थापन करावे. कोरोनामुळे डबघाईला आलेल्या चर्मकार व्यावसायिकांची कर्जमाफी करावी, बार्टी प्रमाणे संत रविदास रिसर्च सेंटर स्थापन व्हावे, अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या धर्तीवर चर्मकार विकास महामंडळाला नियम लागू करावेत आणि संत रविदास महाराज जयंतीला सार्वजनिक सुट्टी जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.
>
> **– बबनराव घोलप, माजी मंत्री**

# जिव्हेश्वर मंदिरात रुद्राभिषेक सोहळा उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : सावेडी येथील जिव्हेश्वर शिवालय मंदिरात श्रावण महिन्याच्या निम्मिताने रुद्राभिषेक सोहळा व स्वामी समर्थांचे अनुष्ठान नुकतेच संपन्न झाले. त्यानिमित्ताने शिव लिंगाला महाकालचे रूप देण्यात आले होते व आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती.

जिव्हेश्वर भक्त सेवा मंडळाच्या या मंदिरात प्रतिवर्षीप्रमाणे पवित्र श्रावण मासनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. या सजावटीचे कौतुक आयुर्वेद शास्त्र मंडळाचे अध्यक्ष सचिन



जगताप, सुखदेव शेडाळे, मंगल शेडाळे, राजेंद्र शेडाळे, ऋतिका शेळके, आशुतोष शेळके, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर अध्यक्ष संपत बारस्कर, संजय झिंजे, सागर मुर्तडकर, चंद्रकांत शेळके, विजय पुंडे, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, मयूर बोचुघोळ, माजी नगरसेवक सुनील त्र्यंबके, मीनाताई चव्हाण, संदीप दातरंगे, योगेश ठुबे, महेश कांबळे, बाबासाहेब गेरांगे, अमोल गायकवाड, आकाश आतकरे, गणेश झिंजे, कुलदीप भिंगारदिवे आदींनी कौतुक केले. सजावटीसाठी आयोजक मंदिराचे पुजारी व युवक अध्यक्ष वैभव आहेर, नलिनी कनोरे, प्रकाश मरवाडे, मंदा पिंपरकर, सोमनाथ खाडे, मंदिराच्या अध्यक्षा मृणाल कनोरे, अर्चना साळी, छायाताई राजपूत, पुष्पा खाडे, मंगलताई शेडाळे, वृषाली भुमकर, रामेश्वरी कांबळे, योगिनी आहेर, निलेश मरकड, स्वप्नील गायकवाड, ज्ञानेश्वर पोतकुले आदींनी सहकार्य केले.

# शेतकरी, व्यापारी व कुरेशी समाजाचा मोर्चा

## गोहत्याबंदी कायद्यात सुधारणा करण्याची आंदोलनकर्त्यांची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : शेतकरी, व्यापारी व कुरेशी समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. गोहत्याबंदी कायद्यामुळे पशुपालक, शेतकरी व व्यापाऱ्यांवर गोरक्षकांच्या नावाखाली अन्याय व अत्याचार होत असून या संदर्भात कायद्यात तातडीने सुधारणा करावी, अशी प्रमुख मागणी यावेळी करण्यात आली.

मोर्चेकऱ्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे



की, जिल्ह्यातील शेतकरी व पशुपालक आपल्या उपजीविकेसाठी म्हैस, जर्सी, भाकड व दुधाळ जनावरांची खरेदी-विक्री करतात. मात्र काही असामाजिक घटना व तथाकथित गोरक्षक यांच्याकडून शेतकरी व कुरेशी समाजावर अन्याय, मारहाण व दडपशाही केली जाते. जनावरे खरेदी-विक्री करताना खोटे गुन्हे दाखल करून घेण्यास जनावरे जप्त केली जाते व ते गोरक्षणालयांत ठेवून काळाबाजारातून विक्री केली जाते, असा गंभीर आरोप समाजाने केला आहे.

कायद्यात सुधारणा करून देशी गाई व्यतिरिक्त इतर जनावरांना सूट द्यावी, जनावरांची वाहतूक करताना पोलीस संरक्षण द्यावे, बेकायदेशीर जप्ती थांबवावी, खोटे फौजदारी गुन्हे मागे घ्यावेत तसेच अधिकृत कत्तलखान्यांना परवानगी द्यावी, अशा प्रमुख मागण्या समाजाच्या वतीने करण्यात आल्या आहेत.

# विद्यार्थ्यांनो, आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करा

## चेअरमन गीते; मनपा कर्मचारी पतसंस्थेकडून गुणवंत पाल्यांसह कर्मचाऱ्यांचा सन्मान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी धैर्याने पुढे यावे. महापालिका कर्मचारी पतसंस्था नेहमीच सभासदांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच क्रीडा व कलाक्षेत्रात करिअर घडवावे, असे प्रतिपादन पतसंस्थेचे चेअरमन विकास गीते यांनी केले.

अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा



सत्कार सोहळा पतसंस्थेचे संचालक सतीश ताठे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाला चेअरमन विकास गीते, व्हा. चेअरमन उषाताई वैराळ, शोभना चव्हाण, बाबासाहेब मुदगल, जितेंद्र सारसर, बाळासाहेब पवार, श्रीधर देशपांडे, कैलास चावरे, बाळासाहेब गंगेकर, किशोर कानडे, अजय कांबळे, विजय कोतकर, गुलाब गाडे, बलराज गायकवाड, प्रमिला पवार, आदी उपस्थित होते.

याप्रसंगी व्हा. चेअरमन उषा वैराळ यांनी उपस्थितांचे आभार मानले. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी यांनी केले.

> पतसंस्थेच्या वतीने दरवर्षी स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून गुणवंत विद्यार्थ्यांचा व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार केला जातो. विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप देणे हे प्रेरणादायी ठरते. त्यातूनच विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी उर्जा मिळते. तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी अनेक वर्षे महापालिकेच्या माध्यमातून कर्तव्य बजावले आहे.
>
> **– बाबासाहेब मुदगल**

# छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा विराजमान करा

## छावा संघटनेची पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : शहरातील प्रोफेसर चौक येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्यासाठी उभारण्यात आलेल्या चौथऱ्याचे काम पूर्ण झाले असूनही अजूनपर्यंत पुतळा विराजमान करण्यात आलेला नाही. या कामातील दिरंगाईबद्दल अखिल



भारतीय छावा संघटनेच्या वतीने पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी महिला जिल्हा अध्यक्ष सुरेखा सांगळे, जिल्हाध्यक्ष रावसाहेब काळे, दत्ताभाऊ वामन, मीनाक्षी धामणे, प्रतिभा भिसे, शिवाजी वेताळ, भगवान काटे, श्रीधर शेलार, विनोद साळवे, पिंटू पवार यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, प्रोफेसर चौकात उभारण्यात आलेल्या चौथऱ्याचे संपूर्ण काम काही महिन्यांपूर्वी पूर्ण झाले असून पुतळा विराजमान करण्यासाठी लागणारी प्रक्रिया रखडली आहे. मनपा अभियंता पारखे यांच्या कामकाजातील दिरंगाईमुळे हे काम अजूनही प्रलंबित आहे. सदर कामाची मुदतही संपली असून, नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. म्हणूनच पालकमंत्र्यांनी लक्ष घालून मनपा प्रशासनाला आवश्यक ते निर्देश द्यावेत व छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा लवकरात लवकर विराजमान करावा, अशी मागणी छावा संघटनेतर्फे करण्यात आली.

# भाजपाच्या शहर जिल्हा उपाध्यक्षपदी वर्मा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : भारतीय जनता पक्षाच्या अहिल्यानगर शहर जिल्ह्याची नूतन कार्यकारणी शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी जाहीर केली. यामध्ये भाजपाच्या शहर जिल्हा उपाध्यक्षपदी गोपाळ वर्मा यांची निवड करण्यात आली आहे.



भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, प्रदेश महामंत्री विजय चौधरी, विभाग संघटन मंत्री रवी अनासपुरे यांच्या मान्यतेने अहिल्यानगर शहर जिल्ह्याच्या नूतन कार्यकारणीची घोषणा करण्यात आली आहे.

गोपाळ वर्मा यांनी २०१३ मध्ये नरेंद्र मोदी आर्मी संघटना स्थापन करुन अध्यक्ष या पदावर राहुन अहिल्यानगरमधील सर्व कॉलेज, सार्वजनिक ठिकाणी टेबल लावुन सदस्यता अभियान मोठ्या प्रमाणात राबवला व पंतप्रधान मोदी यांच्या प्रथम पंतप्रधान पदाच्या उमेदवारीसाठी अहिल्यानगर मधुन तसेच दिलीप गांधी यांना उमेदवारी मिळावी, यासाठी मागणी केली. त्यावेळी मोदी हे प्रथम अहिल्यानगरमध्ये सभेला आले असता वर्मा यांनी प्रखर भाषण केले.

# स्नेहालयाची प्रथा बाल विकासाच्या क्षेत्रात अद्वितीय : एसपी घार्गे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : वंचित बालकांसाठी स्नेहालय संस्थेने हक्काचे सुरक्षित घर, प्रेमाचे गणगोत आणि उज्वल भविष्य दिले. येथील बालकांचा सामूहिक जन्मदिन दरवर्षी भारताच्या स्वातंत्र्य दिनी साजरा करण्याची संस्थेची प्रथा बाल विकासाच्या क्षेत्रात अद्वितीय असल्याचे प्रतिपादन अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घारगे यांनी केले.

स्नेहालय संस्थेतील बालकांच्या आयुष्यात आनंदाचे बिजारोपण करणारा सामूहिक जन्मदिन सोहळा दरवर्षीप्रमाणे यंदाही १५ ऑगस्ट रोजी संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते.संस्थेच्या विश्वस्त आणि उपक्रमाच्या निमंत्रक सपना आसावा यांनी नमूद केले की, संस्थेतील बालकांच्या जन्माची बिनचूक नोंद अनेकदा नसते. त्यामुळे सर्वांचा वाढदिवस एकाच दिवशी आशयसंपन्न पद्धतीने साजरा करण्याची अनोखी पद्धत संस्था राबवते. तो दिवस स्वातंत्र्य दिन असल्याने देशभक्तीची भावना बालमनात पेरली जाते.

# संग्राम भंडारेंवरील हल्ल्याचा भाजपाकडून निषेध

## अहिल्यानगर जिल्हा भाजपाने दिले पोलीस अधिक्षकांना निवेदन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : हभप संग्राम बापू भंडारे यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला आणि त्यांच्या वाहनावर दगड घालून वाहनाचे नुकसान केल्याने या घटनेच्या निषेधार्थ अहिल्यानगर जिल्हा भाजपाच्या वतीने दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीपराव भालसिंग, उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर अहिल्यानगर, शहर अध्यक्ष अनिल मोहिते यांनी अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे




यांना लेखी निवेदन देऊन तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला.

याबाबत सविस्तर असे की, समाजप्रबोधनकार संग्राम बापू भंडारे हे दि. १६ रोजी संगमनेर तालुक्यातील घुलेवाडी येथे हरिनाम सप्ताहामध्ये किर्तन करत असताना श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल प्रतिपादन करत असताना घुलेवाडी गावातील काँग्रेस समर्थक समाजकंटकांनी चालू कीर्तनात विघ्न निर्माण करून आरडा ओरड करून कीर्तन बंद पाडण्याचा प्रयत्न केला. तसेच संग्राम बापू यांच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला आणि त्यांच्या वाहनावर मोठमोठे दगड घालून वाहनाचे नुकसान केले आहे. या सर्व प्रकारामुळे कीर्तनासाठी जमलेल्या माता-भगिनी यांना मनस्ताप सहन करावा लागला.

यावेळी समाज प्रबोधनकार संग्राम बापू भंडारे यांच्यावरील हल्ला नसून हिंदुत्वावर प्रहार करण्याचा सुनियोजित कट असल्याचे स्पष्ट होत आहे. तरी संबंधित हल्लेखोर त्यांना तात्काळ अटक करून यामागील त्यांचा बोलवता धनी कोण आहे? याचा धडा लावणे गरजेचे असल्याचे दिसत आहे.

काँग्रेसचे नेते माजी आमदार थोरात यांचे कार्यालयीन कर्मचारी काही पदाधिकारी असल्याचे यांना चिथावणी व पाठिंबा देणाऱ्यांची सुद्धा चौकशी व पर्दाफाश करणे आवश्यक व गरजेचे आहे. तसेच हभप भंडारे यांना पोलीस संरक्षण देण्यात यावे, अशी मागणी भाजपा अहिल्यानगर जिल्हा पक्षाच्यावतीने करण्यात आली.

> **... दोषींवर कारवाई करण्याचे आश्वासन**
>
> अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी निवेदन स्वीकारून सदर प्रकाराबाबत सखोल चौकशी करून दोषीवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

# संपादकीय

## आयोगाची बाजू काय सांगते?


राहुल गांधी यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणात मतदार घोटाळा झाल्याचा मोठा आरोप केला. मात्र निवडणूक आयोगाने त्यांचे हे आरोप पूर्णपणे फेटाळून लावले. जुन्या आणि आधीच नाकारलेल्या दाव्यांची राहुल पुनरावृत्ती करत आहेत. निवडणूक आयोगाने गांधींना विहित प्रक्रियेनुसार औपचारिक तक्रार दाखल करण्यास किंवा प्रतिज्ञापत्रासह कागदोपत्री पुरावे सादर करण्यास सांगितले; परंतु लोकसभेत घेतलेली शपथ हेच प्रतिज्ञापत्र असल्याचे ते सांगत आहेत. वास्तविक, काही तक्रार असेल तर पुराव्यानिशी तक्रार करून पुरावे द्यायचे असतात. निवडणूक आयोगावर विश्वास नसेल, तर राहुल यांना न्यायालयात जाण्याचा पर्याय होता. तो त्यांनी अवलंबला नाही. राहुल यांनी ज्या कर्नाटकमधील एका मतदारसंघातील उदाहरणे दिली, त्याबद्दल कर्नाटकच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. कर्नाटक, महाराष्ट्र आणि हरियाणाच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनीही राहुल यांना पत्र लिहून आरोपांची माहिती आणि शपथेखाली पुरावे देण्यास सांगितले. तक्रार आणि पुरावे असतील, तर निवडणूक आयोगाला चौकशी करता येईल; परंतु राहुल तक्रार द्यायला तयार नाहीत. निवडणूक अधिकाऱ्यांच्या पत्रात राहुल यांना मतदार नोंदणी नियम, १९६० च्या नियम २०(३)(ब) अंतर्गत शपथपत्रावर स्वाक्षरी करण्यास सांगितले आहे. त्यामुळे अधिकारी सर्व पुरावे गोळा करू शकतील आणि आरोपांची अधिकृत चौकशी सुरू करू शकतील.

मतदार नोंदणी नियम, १९६० चा नियम २० 'दावे आणि आक्षेपांची छाननी' करण्याशी संबंधित आहे. ही प्रक्रिया मसुदा मतदार यादी प्रकाशित झाल्यापासून केवळ ३० दिवसांच्या आत लागू होते. नोंदणी अधिकाऱ्यांना मतदार यादीशी संबंधित कोणत्याही दाव्याची किंवा आक्षेपांची सारांश चौकशी करावी लागते. ही प्रक्रिया मतदार यादीत नावे जोडण्याशी किंवा विद्यमान नोंदींवर आक्षेप घेण्याशी संबंधित आहे आणि मतदार यादी प्रकाशित झाल्यापासून केवळ ३० दिवसांच्या कालावधीसाठी लागू आहे. नोंदणी नियम, १९६० चे थोडक्यात वाचन केल्यास स्पष्ट होते की नियम २० अंतर्गत केलेल्या छाननीसह ही संपूर्ण प्रक्रिया ही एक प्राथमिक पायरी आहे, जी नियम २२ अंतर्गत 'यादीच्या अंतिम प्रकाशना'मध्ये संपते. नियम २२(२) अंतर्गत मतदार यादी अखेर प्रकाशित झाल्यानंतर पुढील निवडणुकीसाठी मतदारसंघाची मतदार यादी असते. निवडणुकीनंतरच्या परिस्थितीत (जसे की सध्याची परिस्थिती) नियम २० लागू असणे प्रक्रियात्मकदृष्ट्या कमकुवत होते. नियम २२ अंतर्गत अंतिम यादी प्रकाशित झाल्यानंतर नियम २० अंतर्गत असलेल्या विशिष्ट प्रक्रिया त्या निवडणूक चक्रासाठी प्रभावी रहात नाही. अंतिम यादी प्रकाशित झाल्यानंतर वैध मानली जाते आणि कोणतेही आव्हान न्यायालयीन कार्यवाहीच्या अधीन असते. २०२४ च्या लोकसभा निवडणुका आधीच पूर्ण झाल्या असल्याने मतदार यादीच्या अंतिम स्थितीबद्दलच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी निवडणूक आयोगाने केलेल्या नियम ाचा वापर प्रक्रियात्मकदृष्ट्या अनियमित मानला जाऊ शकतो.

केलेल्या आरोपांबद्दल राहुल गांधी नियम २० अंतर्गत संबंधित पुरावे सादर करू शकतात. राहुल यांनी केलेल्या दाव्यांचे पुरावे निवडणूक आयोगाकडे नसल्याने आरोपांची अधिकृत चौकशी सुरू करण्यापूर्वी डेटा तपासण्याची जबाबदारी घेणाऱ्या व्यक्तीची त्यांना आवश्यकता आहे. विशेष म्हणजे, नोंदणी नियम, १९६० च्या नियम १७ मध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की विहित कालावधीत किंवा विहित स्वरूपात आणि पद्धतीने दाखल केला न गेलेला कोणताही दावा किंवा आक्षेप नोंदणी अधिकारी ताबडतोब नाकारतील. ही पार्श्वभूमी लक्षात घेतली, तर राहुल यांचे आरोप आणि निवडणूक आयोगाच्या मर्यादा लक्षात येतात. त्यातही राहुल यांनी आरोप सिद्ध करण्यासाठी शपथपत्र दाखल केले, तरी कायद्यानुसार, निवडणूक आयोग नियम १७ अंतर्गत त्याच्या बंधनामुळे त्यांचा दावा नाकारण्यास बांधील आहे. फसवणूक किंवा गैरव्यवहाराच्या आधारावर निवडणूक निकालाला आव्हान देण्याचा एकमेव कायदेशीर मार्ग म्हणजे निवडणूक याचिका दाखल करणे, जी लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ अंतर्गत ४५ दिवसांच्या आत उच्च न्यायालयात दाखल करायची असते. ही मुदतदेखील आता संपली आहे. आता नियम २० किंवा निवडणूक याचिकेचा मार्ग कायदेशीररित्या उपलब्ध नाही. नोंदणी नियम, १९६० मध्ये नमूद केलेल्या ३० दिवसांची अंतिम मुदत संपल्यामुळे आणि 'आरपीए' मध्ये नमूद केलेल्या ४५ दिवसांच्या कालमर्यादेमुळे, राहुल यांनी केलेल्या मतदार फसवणुकीच्या दाव्यांची अधिकृत चौकशी करण्यासाठी कोणताही उपाय उपलब्ध नाही.

राहुल यांनी मतदार यादीमध्ये फेरफार आणि मतचोरीचे गंभीर आरोप केले होते; परंतु याबाबत त्यांच्याच पक्षाचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्यावर त्यांच्या जुन्या मित्र पक्षाकडून धक्कादायक आरोप केले गेल्याने राजकीय खळबळ उडाली. हे प्रकरण २०१८ च्या विधानसभा निवडणुकीत सिद्धरामय्या यांच्या बदामी मतदारसंघातून झालेल्या विजयाबद्दल आहे. माजी केंद्रीय मंत्री आणि सिद्धरामय्या यांचे जवळचे सहकारी सी. एम. इब्राहिम यांनी अलीकडेच आरोप केला की त्यांनी आणि ज्येष्ठ काँग्रेस नेते बी.बी. चिम्मनकट्टी यांनी मिळून तीन हजार मते खरेदी करण्यास मदत केली, जेणेकरून सिद्धरामय्या आपली जागा वाचवू शकतील. मनोरंजक गोष्ट म्हणजे त्या निवडणुकीत त्यांच्या विजयाचे अंतर फक्त १,६९६ मते होते, तर 'नोटा'ला २,००७ मते मिळाली. म्हणजेच त्यांच्या विजयाचे अंतर 'नोटा'पेक्षाही कमी होते. इब्राहिम यांच्या मते, सिद्धरामय्या यांनी स्वतः या मतांच्या खरेदीसाठी पैसे दिले होते. या खुलाशामुळे भाजपला राहुल यांच्यावर निशाणा साधण्याची मोठी संधी मिळाली. भाजपचा आरोप आहे की, ही केवळ २०१८ ची बाब नाही. २००६ च्या चामुंडेश्वरी पोटनिवडणुकीतही असेच काहीसे घडले होते. त्यात सिद्धरामय्या काँग्रेसमध्ये सामील झाल्यानंतर फक्त २५७ मतांच्या फरकाने विजयी झाले. तेव्हाही केंद्रात काँग्रेस सत्तेत होती आणि तेव्हाही मते खरेदी झाली का आणि कोणत्या अधिकाऱ्यांनी निवडणुका घेतल्या याची चौकशी झाली पाहिजे. एकंदरीत, राहुल यांचा निवडणूक आयोगावरील कथित बाँब फुसका ठरण्याची शक्यता आहे.

# ट्रम्पनीतीला सामोरे जाताना...



अवघ्या अर्थनगरीवर गेला काही काळ ट्रम्प यांच्या विक्षिप्तपणामुळे दाटलेले ढग पहायला मिळाले. अर्थविश्वात काही काळ उलटसुलट चर्चा सुरु राहिली. मात्र ट्रम्प यांच्या इशाऱ्यानंतरही भारतातून होणाऱ्या ॲपलच्या निर्यातीत वाढ पहायला मिळाली. अर्थात विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांची भारताकडे पाठ दिसून आली. दरम्यान, भारतात सहकारी तत्त्वावर टॅक्सी सेवा सुरू होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

अवघ्या अर्थनगरीवर गेला काही काळ ट्रम्प यांच्या विक्षिप्तपणामुळे दाटलेले ढग पहायला मिळाले. या निमित्ताने गेला काही काळ अनेक क्षेत्रांमध्ये उलटसुलट चर्चा सुरु राहिली. मात्र ट्रम्प यांच्या इशाऱ्यानंतरही भारतातून होणाऱ्या ॲपलच्या निर्यातीत वाढ पहायला मिळाली. अर्थात विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांची भारताकडे पाठ दिसून आली. दरम्यान, भारतात सहकारी तत्त्वावर टॅक्सी सेवा सुरू होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

अलिकडेच अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के आयात शुल्क लादण्याचा निर्णय जाहीर केला. त्याशिवाय रशियाकडून शस्त्र आणि तेल खरेदी करत असल्याने दंड लावण्याचा इशारा दिला. ट्रम्प यांनी या टॅरिफच्या अंमलबजावणीला एक आठवड्याची मुदतवाढ दिली. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या धमक्यांनंतरही 'ॲपल'ने भारतातून सहा अब्ज डॉलर्स किमतीचे आयफोन निर्यात करण्याचा विक्रम केला. आयफोन निर्माता 'ॲपल'ने विक्रेत्यांद्वारे एप्रिल-जून २०२५ च्या तिमाहीमध्ये भारतातून सहा अब्ज डॉलर्स किमतीचे आयफोन निर्यात केले आहेत. ते गेल्या वर्षीच्या याच कालावधीतील विक्रीच्या तुलनेत ८२ टक्के जास्त आहे. विक्रेत्यांनी सरकारला शेअर केलेल्या डेटाचा हवाला पाहिल्यास 'ॲपल'मुळे भारताची स्मार्टफोन निर्यात वाढली आहे. गेल्या वर्षीच्या पहिल्या तिमाहीमध्ये भारताने फक्त ३.२ अब्ज डॉलर्स किमतीचे स्मार्टफोन निर्यात केले, तर या वर्षाच्या पहिल्या तिमाहीमध्ये 'ॲपल'ने रेकॉर्डब्रेक आयफोन निर्यात केले. भारतातून निर्यात केलेल्या स्मार्टफोनची ही आतापर्यंतची सर्वाधिक संख्या आहे. २०२५-२६ च्या पहिल्या तिमाहीमध्ये 'ॲपल'मुळे भारताची एकूण स्मार्टफोन निर्यात ५८ टक्क्यांनी वाढून ७.७२ अब्ज डॉलर्स झाली. गेल्या वर्षीच्या याच तिमाहीमध्ये ४.९ अब्ज डॉलर्सची निर्यात होती. या काळात भारताच्या एकूण इलेक्ट्रॉनिक्स निर्यातीतही प्रचंड वाढ झाली. २०२५-२६ च्या पहिल्या तिमाहीमध्ये ती १२.४ अब्ज डॉलर्सवर पोहोचली. गेल्या वर्षीच्या याच काळातील पहिल्या तिमाहीतील ८.४ अब्ज डॉलर्सच्या निर्यातीच्या तुलनेमध्ये ती ४८ टक्के जास्त आहे.

या तिमाहीमध्ये एकूण इलेक्ट्रॉनिक्स निर्यातीत स्मार्टफोनचा वाटा ६२ टक्के होता. गेल्या वर्षी हा वाटा ५८ टक्के होता. 'ॲपल'ची ही कामगिरी भारताच्या इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रासाठी मोठे यश आहे; परंतु ते किती काळ टिकेल यावर प्रश्नचिन्ह आहेत. अमेरिकन सरकार सध्या व्यापार विस्तार कायद्याच्या कलम २३२ ची चौकशी करत आहे. हे कलम तिथल्या अध्यक्षांना राष्ट्रीय सुरक्षेच्या आधारावर आयात शुल्क लादण्याची परवानगी देते. अमेरिकेत व्यापार विस्तार कायदा, १९६२ च्या कलम २३२ अंतर्गत अध्यक्षांना राष्ट्रीय सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या उत्पादनांची आयात थांबवण्याचा अधिकार देण्यात आला आहे. चौकशी पूर्ण झाल्यानंतर, भारतातून अमेरिकेत पाठवल्या जाणाऱ्या आयफोनवर आयात शुल्क लावले जाण्याची शक्यता आहे. सध्या या तपासणीमुळे भारतातील स्मार्टफोन, लॅपटॉप आणि सर्व्हरसारखी उत्पादने २५ टक्के शुल्काशिवाय अमेरिकेत निर्यात केली जातील. विदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारात जुलै महिन्यात जोरदार विक्री केली. जुलै महिन्यात विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी १७ हजार ७४१ कोटी रुपयांच्या शेअर्सची विक्री केली. 'एनएसडीएल'वरील डेटानुसार तीन महिन्यांनंतर पुन्हा एकदा विदेशी गुंतवणूकदारांनी विक्री सुरू केली आहे. एप्रिल, मे आणि जून महिन्यांमध्ये विदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारात खरेदी सुरू ठेवली होती. आता जुलै महिन्यात विदेशी गुंतवणूकदारांनी १७ हजार ७४१ कोटी रुपयांच्या शेअर्सची विक्री केली आहे.

**अर्थनगरीतून**
**– महेश देशपांडे**
**आर्थिक घडामोडींचे जाणकार**

विदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारातील आपली भागीदारी २०२५ च्या पहिल्या तीन महिन्यांमध्ये विकली होती. जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात विदेशी गुंतवणूकदारांनी जोरदार विक्री केली. २८ जुलै ते १ ऑगस्ट या कालावधीत 'एफपीआय'ने जोरदार विक्री केली. विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी जुलै महिन्यात १७ हजार ७४१ कोटी रुपयांची विक्री केली. २०२५ या वर्षाचा विचार केला असता विदेशी गुंतवणूकदारांनी पहिल्या सात महिन्यांमध्ये एकूण एक लाख एक हजार ७९५ कोटी रुपयांची विक्री केली. जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांमध्ये विदेशी गुंतवणूकदारांनी जोरदार विक्री केली होती. २०२५ मध्ये विदेशी गुंतवणूकदारांनी मे महिन्यात सर्वाधिक गुंतवणूक केली होती. मे महिन्यात 'एएफपीआय'ने १९ हजार ८६० कोटी रुपयांची गुंतवणूक केली होती. जानेवारी महिन्यात सर्वाधिक ७८ हजार २७ कोटी रुपयांच्या शेअर्सची विक्री केली. जून महिन्यात विदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारात १४ हजार ५९० कोटी रुपयांची गुंतवणूक केली. मार्च महिन्यात तीन हजार ९७३ कोटी रुपयांची विक्री 'एफपीआय'ने केली होती. विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी फेब्रुवारी महिन्यात ३४ हजार ५७४ कोटी रुपयांची विक्री केली होती.

आता एक लक्षवेधी बातमी. भारताचे सहकारी क्षेत्र या वर्षाच्या अखेरीस 'भारत ब्रँड'अंतर्गत टॅक्सी सेवा सुरू करून ओला आणि उबेरसारख्या महाकाय कंपन्यांना आव्हान देण्यास सज्ज आहे. या सेवेचे अधिकृत भांडवल ३०० कोटी रुपये असून चार राज्यांमधील २०० चालक आधीच त्यात जोडले गेले आहेत. 'मल्टी-स्टेट कोऑपरेटिव्ह टॅक्सी लिमिटेड' ही आठ प्रमुख सहकारी संस्थांची संघटना आहे. त्यात राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (एनसीडीसी), 'इंडियन फार्मर्स फर्टिलायझर कोऑपरेटिव्ह लिमिटेड' (इफको) आणि 'गुजरात कोऑपरेटिव्ह मिल्क मार्केटिंग फेडरेशन' (जीसीएमएमएफ) यांचा समावेश आहे. गेल्या महिन्यात सहकार मंत्री अमित शहा यांनी या क्षेत्रासाठी एक व्यापक सहकारी धोरण जाहीर करताना २०२५ च्या अखेरीस सहकारी टॅक्सी सेवा सुरू करण्याचे संकेत दिले. 'एनसीडीसी'चे उपव्यवस्थापकीय संचालक रोहित गुप्ता म्हणाले, की या सेवेचा मुख्य उद्देश चालकांना चांगले परतावे सुनिश्चित करणे आणि प्रवाशांना दर्जेदार, सुरक्षित आणि परवडणाऱ्या सेवा प्रदान करणे आहे. हा उपक्रम कोणत्याही सरकारी भागभांडवलशिवाय चालतो आणि सहभागी सहकारी संस्थांकडून पूर्णपणे निधी दिला जातो. तिच्या संस्थापक सदस्यांमध्ये कृषक भारती सहकारी लिमिटेड (कृभको), राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड), राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ (एनडीडीबी) आणि राष्ट्रीय सहकारी निर्यात लिमिटेड (एनसीईएल) यांचा समावेश आहे. सुमारे २०० चालक आधीच सहकारी संस्थेत सामील झाले आहेत. त्यापैकी प्रत्येकी पन्नासजण दिल्ली, गुजरात, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातील आहेत. सहकारी संस्था आपले नेटवर्क वाढवण्यासाठी इतर सहकारी संस्थांशी सक्रियपणे संपर्क साधत आहे. सहकारी संस्थेने 'राइड-हेलिंग ॲप' विकसित करण्यासाठी तंत्रज्ञान भागीदार निवडण्यासाठी निविदा जारी केल्या आहेत.

या सेवेचे ॲप डिसेंबरपर्यंत तयार होण्याची अपेक्षा आहे. संपूर्ण भारतातील प्लॅटफॉर्मसाठी मार्केटिंग धोरण तयार करण्यासाठी एक तंत्रज्ञान सल्लागार आणि 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट' (आयआयएम) चे सहकार्य घेतले जात आहे. ही सेवा सहकारी किंमत मॉडेल स्वीकारेल. सध्या कामकाज वाढवण्यासाठी सदस्यता मोहिमा सुरू आहेत. ही सेवा सहकारी किंमत मॉडेल स्वीकारेल. सध्या तिचे कामकाज वाढवण्यासाठी सदस्यता मोहिमा सुरू आहेत.

पान १ वरून

## राहुल गांधी 'सिरियल लायर?'

पोस्ट डिलीट केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी महाराष्ट्र विधानसभा जागांमधील मतांच्या संख्येत घट झाल्याची माहिती दिली होती. एक्स वर ही पोस्ट डिलीट केल्यानंतर संजय कुमार यांनी माफीही मागितली आहे. ते म्हणाले की, त्यांच्या टीमने डेटाचा चुकीचा अर्थ लावला होता. त्यांनी हे ट्विट १७ ऑगस्ट रोजी केले होते. भाजपने संजय कुमार यांच्यावर पोस्ट डिलीट केल्याबद्दल टीका केली आहे आणि म्हटले आहे की ही तीच संस्था आहे ज्यावर राहुल गांधी विश्वास ठेवतात.

## ... आता रोजगार निर्मिती होणार

करण्यात आले. त्यावेळी ते गुंतवणूकदारांसमोर बोलत होते. यावेळी मुख्य सचिव राजेशुमार, उद्योग सचिव डॉ. पी. अन्बळगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी वेलारासू, विकास आयुक्त दिपेंद्रसिंह कुशवाह तसेच विविध क्षेत्रातील कंपन्यांचे गुंतवणूकदार उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले की, गुंतवणूकदारांनी अतिशय ठाम आणि सकारात्मक बांधिलकी दाखवली आहे. महाराष्ट्रात गुंतवणूक सुरळीत होण्यासाठी शासनाची संपूर्ण टीम सुरुवातीपासून शेवटपर्यंत तुमच्यासोबत काम करेल. याशिवाय हायपरलूप प्रकल्पालाही गती मिळत आता आयआयटी मुंबई व आयआयटी मद्रास यांच्यामुळे हा प्रकल्प पुन्हा पुढे सरकला आहे. हा प्रकल्प लॉजिस्टिक, वाहतूक आणि मोबिलिटी क्षेत्रात राज्यात नव्हे तर संपूर्ण देशात आमूलाग्र बदल घडवणार असल्याचे त्यांनी सांगितले. सोलर पॅनेल निर्मितीसाठी ज्युपिटर इंटरनॅशनल लि. या कंपनीसोबत १०९०० कोटी रूपयांची गुंतवणूक करार झाला असून यातून ८३०८ रोजगार निर्मिती होणार आहे..रोचक सिस्टिम्स प्रा.लि. या कंपनीसोबत डेटा सेंटर करिता २५०८ कोटी रूपयांचा करार. १ हजार रोजगार निर्मिती. रोव्हिसन टेक हब प्रा.लि. या कंपनीसोबत डेटा सेंटर या सेक्टरकरिता २५६४ कोटी रूपयांची गुंतवणूक करार. ११०० रोजगार निर्मिती. वॉव आयर्न ॲण्ड स्टिल प्रा.लि. यासाठी पोलाद उद्योगाकरिता ४३०० कोटी रूपयांचा करार. १५०० रोजगार निर्मिती.

## पावसाने लाखो एकर क्षेत्र पाण्याखाली

माहिती घेतली. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांना योग्य त्या उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, मुसळधार पावसामुळे मुंबई महापालिकेने शाळांना सुट्टी जाहीर केली आहे. मिठी नदीची पाणीपातळी वाढत आहे. मिठी नदीची जिथे पातळी वाढते, तेथील दोन्ही बाजूंच्या नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्याच्या मुद्यावर चर्चा झाली. एकंदरीत आत्ताच्या घडीला मुंबई व मुंबई उपनगर, पालघर, ठाणे, रत्नागिरी या सर्व भागात रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. हवामान खाते दर ३ तासांना आपला अंदाज जारी करत आहे. पण एकूण संपूर्ण राज्यात पाऊस सुरू आहे. आतापर्यंत जवळपास १० लाख एकर क्षेत्र पाण्याखाली गेले आहे. पीकपाणी पाण्याखाली गेलेत. माझी जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा झाली आहे. त्यांनी दोन दिवसांत पंचनामे करण्याची ग्वाही दिली आहे. बऱ्याचशा ठिकाणी एनडीआरएफ व एसडीआरएफच्या टीम्स काम करत आहेत. नांदेडच्या परिसरात आपण आर्मीला पाचारण केले आहे. ते सुद्धा तिथे आलेत. काही गावांना पाण्याने वेढा घातला आहे. बचाव पथकाने तेथील नागरिकांना सुरक्षित बाहेर काढले आहे, असे ते म्हणाले. उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, मुंबईतील नागरिकांना आवश्यक असेल तरच घराबाहेर पडण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सुरक्षित राहण्यासाठी आपापल्या घरीच राहणे चांगले ठरेल. दुसरी गोष्ट म्हणजे आपण मुंबईतील शाळा व महाविद्यालयांना सुट्टी दिली आहे. साताराचा घाटमाथा, कोल्हापूरचा घाटमाथा, पुण्याचा घाटमाथा आदी उंच ठिकाणांवर मोठ्या प्रमाणात पाऊस होण्याची शक्यता आहे. तिथे रेड अलर्ट दाखवण्यात आला आहे. मुंबईतील काही ठराविक स्पॉट आहेत. त्याठिकाणी पाणी साचले आहेत. पोलिस यंत्रणाही अलर्ट आहेत.

## पूरस्थितीला सरकार जबाबदार

नांदेड जिल्ह्यातील पूरस्थितीवर भाष्य करते त्याला सरकार जबाबदार असल्याचा आरोप केला. नांदेड जिल्ह्यात पूरस्थिती उद्धवली आहे. ११ गावांचे पुनर्वसन करता धरणाचे काम सुरू करण्यात आले. त्यामुळे जे व्हायला नको ते झाले. यांना माणसाची कदर नाही. माणुसकीची तर नाहीच. यांना फक्त कंत्राटदारांचे खिसे कसे भरायचे हेच ठावूक आहे.

## शिंदे-शिरसाटांच्या खिशात कोट्यवधींचा मलिदा

धर्मदाय किंवा सामाजिक कार्य म्हणून केलेला नाही, असे उबाठाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे. संजय राऊत म्हणाले की, अमित शहा यांच्याकडे बोट दाखवले जात आहे. त्यांनी या घोटाळ्याची नुसती चौकशी नाही तर एकनाथ शिंदे आणि संजय शिरसाट यांना बडतर्फ करायला हवे असे पत्र मी गृहमंत्री शहा यांना लिहले आहे. अंतुले यांचे पद पत्रकारांमुळेच गेले होते म्हणून असे विषय धरुन ठेवण्याची पत्रकारांचीही जबाबदारी आहे. मीडियाने हा विषय चालवत ठेवला पाहिजे. हजारो प्रकल्पग्रस्त लोकांना जमीन मिळत नाही. ५ हजार एकर जमीन एका व्यक्तीला दिली जाते, ती संजय शिरसाट आणि एकनाथ शिंदे याच्या आदेशाने. त्यांच्यावर गुन्हे दाखल केले पाहिजे, अशी मागणी संजय राऊत यांनी केली आहे. शहांवर आरोप करत असलो तरी ते गृहमंत्री आहेत म्हणून त्यांना मी पत्र लिहले आहे. संजय राऊत म्हणाले की, सिडकोने ही जमीन बिवलकरांची ही जमीन नाही हे सांगण्यात घालवले. सुप्रीम कोर्टाचे तेच म्हणणे असताना हे सर्व काही डावलून जेव्हा ५ हजार एकर जमीन देण्याचा निर्णय होतो तेव्हा हे ५० हजार कोटी रुपये गेले कुठे? हे दिल्लीपर्यंत गेले हे त्यांचेच लोक सांगत आहे. कोर्टाचा स्टे असताना नगरविकास खात्याचे मंत्री एकनाथ शिंदे आणि संजय शिरसाट यांनी संगनमताने ही जमीन बिवलकरांना दिली आहे. सिडकोच्या अधिकाऱ्याचा यासाठी विरोध होता. प्रकल्पग्रस्तांना जमिनी दिल्या जात नाही. हे आदेश काढण्याच्या हेतूनं २५ दिवसांसाठी संजय शिरसाट यांना सिडकोचे अध्यक्ष करण्यात आले. हा २५ दिवसांमध्ये हा निर्णय घेण्यात आला. तेव्हाचे संबंधित मंत्री आणि सिडको अध्यक्ष यांना २० हजार कोटी रुपयांचा मलिदा त्यावेळी मिळाला आहे. यातील १० हजार कोटी दिल्लीमध्ये त्यांच्या बॉसला देण्यात आले आहे. संजय राऊत म्हणाले की, भ्रष्टाचाऱ्यांचा, घोटाळेबाजांना संरक्षण देणारे सरकार महाराष्ट्रात अमित शहा यांच्या आशीर्वादाने सुरू आहे. ज्यांनी कारवाई करावी ते गृहखाते राज्यात अन् देशात भाजप कडेच आहे. म्हणून घोटाळेबाजांना संरक्षण मिळत आहे. ५० हजार कोटीच्या घोटाळ्याचे पुरावे देवेंद्र फडणवीस यांना हवे असतील तर त्यांनी सिडकोचे तत्कालीन अध्यक्ष विजय सिंगल, डिगीकर यांना का बदलून जावे लागले कारण त्यांनी सही करण्यास नकार दिला. सिडकोच्या अध्यक्ष पद संजय शिरसाट यांना देण्यात आले आणि त्यांच्याकडून ५ हजार एकराचा भूखंड एकनाथ शिंदे आणि संजय शिरसाट यांनी हा भूखंड बिवलकर नावाच्या व्यक्तीला दिला ज्याचा यावर अधिकारच नाही.

पान १ वरून

## दूध दरवाढीसह भेसळीविरोधात लंके आक्रमक

खासदारांनी काल, मंगळवारी संसद भवनासमोर आंदोलन करत सरकारचे लक्ष वेधले. दुधाची दरवाढ आणि भेसळीविरोधात खासदार नीलेश लंके यांनी आक्रमक भूमिका घेत सरकारने दोन्ही प्रशनावर तत्काळ निर्णय घेण्याची मागणी केली. या आंदोलनात खा. नीलेश लंके, इंडिया आघाडीचे खा. नामदेव किरसान, शोभाताई बच्छाव, बळवंतराव वानखेडे, छत्रपती शाहू महाराज, धैर्यशील मोहिते पाटील, श्याम बर्वे, संजय देशमुख, प्रियंका चतुर्वेदी, वर्षा गायकवाड, खा. बजरंग सोनवणे, अरविंद सावंत, डॉ. कल्याण काळे आदी सहभागी झाले होते. खा. लंके व इतर खासदारांनी संसद भवनात आंदोलन करत सरकारचे लक्ष वेधले. यावेळी दूध भेसळीचा प्रतिकात्मक प्रात्यक्षिकही दाखविण्यात आले. या आंदोलनादरम्यान खासदारांनी जोरदार घोषणाबाजी केली. दुधाचे बाजारभाव वाढले पाहिजेत, दुधाचे दर उत्पादन खर्चाच्या आधारे ठरवले गेले पाहिजेत, भेसळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे, शेतकऱ्यांना त्यांच्या श्रमाचे योग्य मोबदला मिळाला पाहिजे अशी घोषणाबाजी करत खासदारांनी संसद भवन परिसर दणाणून सोडला.

## कीर्तनकारांनी कुणाचीही बाजू घेऊन बोलू नये

भंडारे यांनी दिलेल्या धमकीवर भाष्य करताना म्हणाले.

ते पुढे म्हणाले, संग्राम भंडारे आपल्या कीर्तनात मूळ विषय सोडून दुसरेच काहीतरी बोलत होते. स्थानिक राजकारणावर भाष्य करत होते. त्यामुळे एका तरुणाने त्याचा विरोध केला. त्याने त्यांना केवळ अभंगावर बोलण्याची विनंती केली. त्यानंतर महाराज खूपकाही बोलले. त्यांनी त्या तरुणावरच टीका केली. हे तथाकथित महाराज आहेत. त्यांच्यासारखे अनेकजण राजकारण करण्यासाठी या क्षेत्रात शिरलेत.

पोलिस या प्रकरणी दबावाखाली काम करत आहेत. पोलिस यंत्रणेने निष्पक्षतेने काम केले पाहिजे. कारण, ही एक स्वतंत्र यंत्रणा आहे. पण दुर्दैवाने ही यंत्रणा आज कुणाच्या तरी फोनमुळे दबावाखाली काम करत आहे. हा दबाव येथे अशांतता निर्माण करण्याचा एक भाग आहे. जे युवक पुढे येतील, त्यांचा छळ करण्यासाठी हे सुरू आहे. त्या ठिकाणी हजर नसलेल्या तरुणांवरही या प्रकरणी कारवाई केली जात आहे, असे थोरात म्हणाले. थोरात पुढे म्हणाले, या महाराजांना कुणीही धक्काबुक्की केली नाही. त्यांची गाडीही फोडली नाही. पण त्यानंतरही या प्रकरणी खोटेनाटे गुन्हे दाखल केले जात आहेत. येथील लोकप्रतिनिधी व हे महाराज संगमनेर तालुक्यात अस्वस्थता निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. ते कुणाच्या तरी इशाऱ्यावर का करत आहरेत. हे लोक संपूर्ण महाराष्ट्रभर अशी विधाने करत फिरत असतात ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे माझ्याविरोधात नथुराम गोडसे व्हावे लागेल असे म्हणून मला धमकी दिली जात आहे. मी महात्मा गांधी नाही, पण विचारांसाठी लढणारा आहे. या विचारांसाठी माझी आनंदाने बलिदान स्वीकारण्याची तयारी आहे. बाळासाहेब थोरात यांनी यावेळी महाराष्ट्राच नाही तर संपूर्ण देशातील राजकारणाचा स्तर घसरल्याचाही आरोप केला. सद्यस्थितीत देशातील राजकीय पातळी घसरली आहे. माजी उपराष्ट्रपती अजून सापडत नाहीत. देशाचे माजी निवडणूक आयुक्तही गायब झालेत. सध्या सूडाचे राजकारण सुरू आहे. राज्याची पातळी तर फारच घसरली आहे. त्याने आता तळ गाठला आहे. राज्यातील आमदार कसेही वागत आहेत. महाराष्ट्रात सध्या चांगल्या माणसांची अब्रु काढण्याचे उद्योग सुरू झालेत. राजकारणाची पातळी केवळ संगमनेरची नाही तर संपूर्ण राज्य व देशाची घसरली आहे, असे ते म्हणाले.

बाळासाहेब थोरात यांनी यावेळी देशाच्य निवडणूक आयुक्तांवरही टीका केली. ते म्हणाले, देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांची पत्रकार परिषद पाहून मला हसू आले. त्यांनी स्वतःचा पक्ष काढला पाहिजे. कारण, सगळेच त्यांच्या हातात आहेत. ते एखाद्या राजकीय पक्षाच्या नेत्यासारखे बोलत आहेत. त्यांची बोलण्याची पद्धत पाहता ते जनतेसाठी काम करतात असे वाटत नाही. त्यांनी कोणत्याही आरोपाला उत्तर दिले नाही. त्यांनी ४५ दिवसांत सीसीटीव्ही फुटेज नष्ट करण्याच्या मुद्यावर अत्यंत गंमतीदार उत्तर दिले. तुम्ही का डिजिटल स्वरुपातील यादी दिली नाही? कागदांचे गठ्ठे का दिले? त्यांनी अनेक गोष्टींचे उत्तर दिले. त्यांचे बोलणे एखाद्या राजकीय पुढाऱ्यासारखे होते. माझ्या मते, ते त्यांना कुणीतही लिहून दिलेले वाचून दाखवत होते. निवडणूक आयोगाने राहुल गांधी यांना ७ दिवसांचा अल्टीमेटम दिला आहे. पण त्या अल्टीमेटमला काहीही अर्थ नाही. आयोगाचे वागणे स्वतंत्रपणाचे दिसत नाही. आता सर्वांना टी एन शेषण यांची आठवण येत आहे. निवडणूक कसा काम करतो, त्याची स्वायत्ता कशी असते याचे आदर्श उदाहरण शेषण यांनी घालून दिले आहे, असे थोरात म्हणाले.

## जनतेचा पाठिंबा हीच माझी खरी ताकद

सर्वांगीण विकासासाठी आपली साथ अशीच राहू द्या, असे आवाहन आ. आशुतोष काळे यांनी केले आहे. कोपरगाव शहरातील प्र.क्र.०२ मध्ये १ कोटी ५९ लक्ष रुपये निधीतून विविध विकास कामांचे भूमिपूजन आ.आशुतोष काळे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. या विकासकामांमध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती ते नगर-मनमाड रस्ता करणे, आढाव वस्ती ते पाण्याची टाकी रस्ता करणे,जानकीविश्व-रिद्धी सिद्धीनगर प्रमुख रस्ता पेव्हिंग ब्लॉक बसवणे, जानकी विश्व-श्री म्हसोबा मंदिर पेव्हिंग ब्लॉक बसवणे, गंगा माता मंदिर परिसर पेव्हिंग ब्लॉक बसवणे, आढाव वस्ती पेव्हिंग ब्लॉक बसवणे, संभाजी जाधव घर ते स्वामी समर्थ मंदिर रस्ता पेव्हिंग ब्लॉक बसवणे आदी कामांचा सामावेश आहे. आ. काळे म्हणाले की, कोपरगाव शहरात मागील पाच वर्षात झालेल्या विकास कामांमुळे जनता समाधानी आहे. सर्व सामान्य जनता व विशेषतः महिला भगिनींना भेडसावणारा पाणी प्रश्न पाच नंबर साठवण तलावाच्या माध्यमातून सुटला असून नागरीकांना तीन ते चार दिवसांनी नियमितपणे पाणी मिळत आहे. परंतु कोपरगावच्या नागरिकांना दररोज पाणी कसे मिळेल. यासाठी माझे प्रयत्न सुरु असून त्यामध्ये यश देखील मिळणार आहे. यापुढेही आपल्याला कोपरगाव शहरातील अनेक विकास कामे पूर्ण करायची असून स्वच्छ, सुंदर, सुरक्षित आणि विकसित कोपरगाव घडवण्याचा संकल्प पूर्ण करायचा आहे. हा संकल्प पूर्ण करण्यासाठी जसा आजपर्यंत तुमचा पाठिंबा माझ्या पाठीशी होता, तसाच तो यापुढेही ठेवावा, असे आवाहन आ. काळे यांनी कोपरगावकरांना केले आहे. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, माजी नगरसेवक, कार्यकर्ते व प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीरामपुरात कांदा १९०० रुपयांपर्यंत



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये काल झालेल्या लिलावात कांद्याला १९०० रुपयांपर्यंत दर मिळाला. ३३८३७ गोण्यातून कांद्याची आवक झाली. त्यात एक नंबर कांद्याला १६०० ते १९०० रुपये, दोन नंबरला ११०० ते १५५०, तीन नंबरला ७०० ते १०५० रुपयांपर्यंत दर मिळला तर खादला ३०० ते ६५० व गोल्टीला ११०० ते १४०० रुपयांपर्यंत दर मिळाला. तसेच ७० क्विंटल आवक झालेल्या बटाट्याला १४०० ते १७०० रुपयांपर्यंत दर मिळाला. तर आले (११० क्विंटल) १८०० ते ३६००, कोबी (१९ क्विंटल) ७०० ते १०००, फ्लावर (१३ क्विंटल) ७०० ते १२००, हिरवी मिरची (२० क्विंटल) २००० ते ४०००, लसूण (७क्विंटल) ३००० ते ५५००, डाळिंब (१४ किंटल) ३००० ते ११००० तर ७ क्विंटल आवक झालेल्या मोसंबीला २००० ते ५५०० रुपयांपर्यंत दर मिळाला, अशी माहिती बाजार समितीचे सभापती सुधीर नवले व सचीव साहेबराव वाबळे यांनी दिली.

# आदिवासी विद्यार्थ्यांचे सर्व प्रश्न तातडीने सोडवा

## डॉ. जयश्री थोरात; आदिवासी विद्यार्थ्यांचे आंदोलन; आ. लहमटेंचाही पाठिंबा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : आदिवासी मुलांच्या शासकीय वसतिगृहातील दुरावस्था, विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या अपुऱ्या सोयी या विरोधात २५० विद्यार्थ्यांनी मागील दोन दिवसांपासून आंदोलन सुरू केले असून या आंदोलनाला अकोले तालुक्याचे आमदार डॉ. किरण लहामटे व युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉक्टर जयश्री थोरात यांनी पाठिंबा दिला असून आदिवासी विद्यार्थ्यांचे सर्व प्रश्न तातडीने सोडवा, अशी मागणी डॉ. जयश्री थोरात यांनी केली असून या विद्यार्थ्यांच्या बाबत कोणतीही गैरसोय सहन करणार नाही, असे आ. किरण लहामटे यांनी म्हटले आहे.



घुलेवाडी येथील आदिवासी विद्यार्थ्यांचे शासकीय विश्रामगृह येथे सुरू असलेल्या आंदोलनाला आमदार लहामटे व थोरात यांनी भेट दिली. यावेळी विद्यार्थ्यांच्या सर्व अडचणी त्यांनी समजावून घेतल्या. याप्रसंगी संगमनेर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष अजय फटांगरे आदिवासी विभागाचे अध्यक्ष बाळकृष्ण गांडाळ, प्रकल्पा अधिकारी देवकन्या बोडके आदी उपस्थित होते.

संगमनेर हे मोठे शैक्षणिक केंद्र असून संगमनेर व अकोले तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाची चांगली सुविधा मिळावी, याकरीता माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या संकल्पनेतून घुलेवाडी येथे भव्य व अद्यावत आदिवासी विद्यार्थ्यांचे वसतिगृह निर्माण करण्यात आले आहे. अनेक दिवसांच्या नंतर या गृहामध्ये आदिवासी विभागाच्या वतीने निधीची कमतरता दिसत असून विद्यार्थ्यांनी वसतिगृहातील दुरावस्था व आपल्या स्वयंबाबत ७ ऑगस्ट रोजी आदिवासी विभागाकडे मागणी केली होती अन्यथा उपोषणाचा इशारा दिला होता.

आमदार लहामटे म्हणाले की, शिक्षण हे अत्यंत महत्त्वाची असून कोणतीही गैरसोय खपवून घेतली जाणार नाही. वसतिगृहाची क्षमता वाढून घेण्यासाठी पाठपुरावा करा. संगमनेरला विद्यार्थ्यांची संख्या जास्त असून या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी जवळ इमारत शोधून तेथे विद्यार्थ्यांची व्यवस्था करावी.

### विद्यार्थ्यांच्या या आहेत मागण्या

वसतिगृहाला रंगरंगोटी करावी, प्रवेश क्षमता वाढवावी, नवीन इमारत बांधावी, ५ किलोमीटर पेक्षा दूर प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवास खर्च मिळावा, नवीन संगणक मिळावे, अद्यावत स्टडी रूम असावी, लाईट दुरुस्ती करावी, विद्यार्थ्यांना गरम पाण्याची व्यवस्था असावी. वसतिगृहामध्ये स्वच्छता कर्मचाऱ्यांमध्ये वाढ व्हावी, ग्रंथालयामध्ये पुस्तकांची वाढ व्हावी, व्यायामशाळा असावी, खेळाची सुविधा निर्माण करावी अशा विविध मागण्या केल्या आहेत.

## गणेश मूर्ती बनविण्याची कार्यशाळा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : रोटरी क्लब ऑफ कर्जत सिटी व जिजाऊ ब्रिगेड कर्जत यांच्यावतीने पर्यावरण पूरक श्री गणेश मूर्ती बनवण्याची कार्यशाळा पार पडली. भाग्यतारा मंगल कार्यालय या ठिकाणी झालेल्या या कार्यशाळेत सुमारे ७५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

प्रसिद्ध मूर्तिकार ओंकार जंजिरे यांनी विद्यार्थ्यांना गणेश मूर्ती कशी बनवायची? हे शिकविले. कार्यशाळेत सहभागी झालेल्या सर्वच विद्यार्थ्यांनी अतिशय सुबक अशा पर्यावरण पूरक गणेश मूर्ती बनवल्या. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रोजेक्ट चेअरमन विष्णुपंत नेटके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रोटरी क्लब ऑफ कर्जत सिटीचे अध्यक्ष प्राचार्य चंद्रकांत राऊत म्हणाले की, विद्यार्थ्यांना बालवयातच पर्यावरणाविषयी जाणीव, जागृती निर्माण व्हावी व पर्यावरण रक्षणाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावे, या हेतूने पर्यावरण पूरक गणेश मूर्ती बनवण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

यावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या तालुकाध्यक्षा उज्वला शेळके-धस तसेच रोटरी सदस्य डॉक्टर संदीप काळदाते, राजेंद्र जगताप, उपमन्यु शिंदे, राहुल खराडे, पत्रकार गणेश जेवरे, प्राचार्य राजकुमार चौरे, नितीन तोरडमल, रवींद्र राऊत, नितीन देशमुख, राजेंद्र पठाडे, संदीप गदादे, डॉक्टर विजय चव्हाण व ज्येष्ठ कलाशिक्षक सुनील भोसले उपस्थित होते.

## मांदळी येथील शेतकऱ्यांची फसवणूक

### रस्त्यात गेलेल्या शेतजमिनीचा मिळाला कमी मोबदला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : श्रीक्षेत्र मांदळी येथील शेतकऱ्यांची अहिल्यानगर-करमाळा- टेंभुर्णी राष्ट्रीय महामार्ग लगत गेलेल्या शेतजमिनीचा मोबदला खूपच कमी मिळाला असून, यामध्ये शेतकऱ्यांची मोठी फसवणूक झाली आहे. शेतकऱ्यांना मोबदला कमी देऊन मोठी फसवणूक झाल्याचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज अशिया यांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने निवेदन देवून आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.




यावेळी मनसेचे विद्यार्थी सेनेचे राज्य उपाध्यक्ष सुमित भाऊ वर्मा, नगर शहराचे शहराध्यक्ष गजेंद्र राशिनकर, मनसेचे तालुकाध्यक्ष सचिन सटाले उपस्थित होते.या निवेदनामध्ये पुढे म्हटले आहे की, अहिल्यानगर-करमाळा- टेंभुर्णी या राष्ट्रीय महामार्गात मांदळी येथील शेतकऱ्यांना १ लाख १६ हजार रुपये प्रतिगुंठा मोबदला दिला आहे. परंतु शेजारील गावांना श्री क्षेत्र मांदळी पेक्षा पाचपटीने अधिक दर देण्यात आला आहे. शासनाने सामान्य शेतकऱ्यांची फसवणूक केली असून यांच्या शेत जमिनीचा त्यांना पूर्ण मोबदला मिळाला पाहिजे. प्रसंगी याबाबत आंदोलन देखील करण्यात येईल. याबाबत जिल्हाधिकारी यांना मांदळी ग्रामस्थांनी लेखी निवेदन दिले आहे. मनसे अध्यक्ष सचिन सटाले, राजेंद्र जगन्नाथ गांगर्डे , रामदास भुजबळ, नीलकंठ भुजबळ, रमेश भुजबळ, पार्वतीबाई गांगर्डे, राजेंद्र शिंदे, बाजीराव शिंदे, भाऊसाहेब गांगर्डे, संपत सकट, नामदेव गांगर्डे, जनार्दन किसन शिंदे, लक्ष्मण शिंदे, रघुनाथ हरिभाऊ गांगर्डे, शेख हज्जू, बबन बाजीराव वाघ, भाऊ उल्हारे यांच्या सह्या आहेत.

## संमेलनाच्या अध्यक्षपदी फंड यांची निवड

**जनता आवाज वृत्तसेवा**



**आहिल्यानगर** : निमगाव वाघा (ता. नगर) येथे ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनानिमित्त तिसऱ्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी राजेंद्र सुंदरदास फंड यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती संमेलनाचे संयोजक तथा ग्रामपंचायत सदस्य नाना डोंगरे यांनी दिली. स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने हे संमेलन होत आहे. ५ सप्टेंबरला होणाऱ्या साहित्य संमेलनानिमित्त गावातून ग्रंथ दिंडी काढली जाणार आहे. या दिंडीत साहित्यिक व कवी सहभागी होणार आहेत. यानंतर परिवार मंगल कार्यालयात मान्यवरांच्या हस्ते संमेलनाचे औपचारिक उद्घाटन होणार आहे. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत यांचे परिसंवाद आणि व्याख्याने आयोजन करण्यात आले आहे.

## ‘पाटबंधारे’ने हॉटेल दिऊरा ते पावन गणपती मंदिर रोड परिसरातील अतिक्रमणे हटविली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : शहरातील हॉटेल दिऊरा ते श्री पावन गणपती मंदिर रोड परिसरातील अतिक्रमणे पाटबंधारे विभाग व पालिका प्रशासनाने संयुक्तीकपणे हटविली. या परिसरातील २७ अतिक्रमणे हटविण्यात आली. अतिक्रमणे काढल्याने त्या परिसराने मोकळा श्वास घेतला आहे.

शहरात पालिकेच्या वतीने अतिक्रमण काढण्याची मोहीम अनेक दिवसांपासून सुरु आहे. परंतू पाटबंधारे विभागाच्या हद्दीतील अतिक्रमणे जशीच्या तशी उभी होती, गेल्या महिन्यात दहाव्याच्या ओट्यापासून ते महानुभाव आश्रमापर्यंतची कॅनॉल परिसरातील अतिक्रमणे पाटबंधारे विभागाने हटविली होती.



काल पुन्हा हॉटेल दिऊरा ते श्री पावन गणपती मंदिर रोड परिसरातील अतिक्रमणे काढण्यात आली. काल सुमारे २७ अतिक्रमणे काढण्यात आली. अतिक्रमण काढताना व्यावसायिकांचे नुकसान होवू नये म्हणून ज्यांनी स्वः तहून अतिक्रण काढण्याची तयारी दर्शविली त्यांना सायंकाळी ६ वाजेपर्यंतची मुदत दिल्याने अनेकांचे नुकसान टळले.

सदर अतिक्रमण मोहीम प्रशासकीय अधिकारी किरण सावंत पाटील, मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी उपअभियंता संजय कल्हापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली पाटबंधारे विभागाचे शेख, पालिका अभियंता सुर्यकांत गवळी, अतिक्रमण विभाग प्रमुख संजय शेळके, संजय आरणे, सुनिल केदार, प्रशांत जगधने, राम शेळके आदींनी राबविली.

## ठुबे काँग्रेसच्या जिल्हा कार्यकारिणीवर

**जनता आवाज वृत्तसेवा**



**पारनेर** : कान्हुर पठार येथील सामाजिक कार्यकर्ते व अभियंता म्हणून प्रसिद्ध असलेले सुभाष तबाजी ठुबे यांची नगर जिल्हा काँग्रेस कार्यकारिणीच्या सदस्यपदी निवड करण्यात आली. पारनेर तालुकाध्यक्ष संभाजी रोहोकले यांनी त्यांना निवडीचे पत्र दिले.अभियंता सुभाष ठुबे हे गेल्या अनेक वर्षांपासून काँग्रेस पक्ष संघटना मजबूत करण्या बरोबरच संघटनेची बांधणी, ध्येय, धोरणे, विचार सामान्य जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असतात. त्यांची काँग्रेस पक्षाप्रती असलेली निष्ठा लक्षात घेऊनच त्यांना जिल्हा स्तरावर काम करण्याची संधी पक्ष नेतृत्वाने दिली आहे.पारनेर तालुक्यातील पक्षाचे जुने - जाणते निष्ठावंत नेते, कार्यकर्ते व नवीन कार्यकर्ते - नेते यांची एकत्रित सांगड घालून सर्वांना बरोबर घेत पक्षासाठी विविध उपक्रम राबवणार असून पक्ष संघटना मजबूत करणार असल्याचा विश्वास ही ठुबे यांनी व्यक्त केला.

## माहेश्वरी सभेकडून ५४ मुलींचे सर्व्हयकल कॅन्सर लसीकरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : संगमनेर तालुका माहेश्वरी सभेच्यावतीने रविवारी सामाजिकदृष्ट्या उपयुक्त ठरलेला सर्व्हयकल कॅन्सर व्हॅक्सिनेशन कॅम्प यशस्वीरीत्या पार पडला.

या कॅम्पचे आयोजन अखिल भारतीय माहेश्वरी महासभेच्या प्रेरणेने करण्यात आले होते. श्री बांगड मेडिकल वेल्फेअर सोसायटीच्या सहकार्याने तसेच महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभा, अहिल्यानगर जिल्हा माहेश्वरी सभा आणि श्री माहेश्वरी सेवा समिती नगर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पाडला. यामध्ये संगमनेर तालुका माहेश्वरी सभेने मध्यवर्ती भूमिका बजावली. या उपक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अशोक फोपळे व डॉ. ओमप्रकाश सिकची उपस्थित होते. डॉ. रवीन चांडक, डॉ. किरण चांडक, डॉ. योगेश व्ही. भुतडा व डॉ. रेश्मा भुतडा यांनी परिश्रम घेऊन संपूर्ण व्यवस्थापन सक्षमपणे पार पाडले. अध्यक्ष श्रीनिवास भंडारी, सचिव जुगलकिशोर बाहेती, कोषाध्यक्ष सुजितकुमार खटोड, सहसचिव जयप्रकाश भुतडा, उपाध्यक्ष संजय आर. मालपाणी व संघटन मंत्री सचिन मणियार यांनी नियोजनबद्ध कार्यवाही करून कॅम्पला यश मिळवून दिले. यावेळी प्रदेशचे सहमंत्री राहुल बाहेती आणि जनसंपर्क प्रतिनिधी अजय जाजू उपस्थित होते. या कॅम्पमध्ये एकूण ५४ मुलींना सर्व्हयकल कॅन्सरपासून बचाव करणारी लस देण्यात आली. या लसीचे वैशिष्ट्य म्हणजे तिच्या माध्यमातून महिलांना होणाऱ्या गर्भाशय मुखाच्या कॅन्सरपासून प्रभावी संरक्षण मिळते. महत्वाचे म्हणजे, या लसीचा बाजारभाव जवळपास २ हजार रुपये असूनही कॅम्पमधून ती प्रतिलस केवळ ३०० रुपयांत उपलब्ध करून देण्यात आली.



## सोनईत तुळजाभवानी मूर्तीची मिरवणूक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई** : सोनई येथील दरंदले गल्लीतील श्री तुळजाभवानी देवीच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळ्यास सुरुवात करण्यात आली आहे यात सोमवारी भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी पुरूष व महिला भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सोनई परिसरातील दरंदले परिवार, भाविक व ग्रामस्थांच्या प्रयत्नातून एक कोटीच्या खर्चाचे मंदिराचे काम पूर्णत्वास आले आहे. चार दिवस चालणाऱ्या या सोहळ्यात मंगळवारी महंत भास्करगिरी महाराज यांचे हस्ते मूर्ती सिंहासन पूजन, बुधवारी मूर्ती प्रतिष्ठापना, गुरुवारी पूजा सोहळा व महाप्रसाद वाटप होणार आहे. सोमवारी झालेल्या भव्य मिरवणुकीत फ ुलांनी सजवलेल्या रथात मुर्ती, पुरुषांच्या डोक्यावर भगवी टोपी, हातात भगवा ध्वज स्त्रियांचे डोक्यावर कलश तसेच टाळ मृदंग व लेझीम पथकासह परिसरातील भाविक व ग्रामस्थांनी तुळजाभवानी मूर्तीची फटाक्यांच्या आतिषबाजीत मिरवणूक काढण्यात आली.




सकाळी डॉ. माऊली दरंदले यांनी सपत्नीक देवीची पूजा अर्चा केली .देवीची भव्य मिरवणूक माधव बाबा चौक, छत्रपती संभाजी महाराज चौक, महावीर पेठ हलवाई गल्ली, आंबेडकर चौक, बस स्थानक, राहुरी रस्ता, महादेव मंदिर, महेश चौक, दरंदले गल्ली या मार्गाने ही मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक मार्गावर सडा रांगोळी व देवीची पूजा करण्यात आली.

# राहुरीत माजी नगराध्यक्षांसह ८ नगरसेवकांवर संकट

## १२ प्रभागातून २४ नगरसेवकांची निवड होणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : राहुरी नगरपालिकेच्या प्रभाग रचनेचा आराखडा जाहीर करण्यात आला. नागरिकांच्या माहितीसाठी जाहीर करणार आलेल्या आराखड्यावर येत्या २१ ऑगस्टपर्यंत पालिका प्रशासनकडे हरकती घेणे अपेक्षित आहे. त्यानंतर अंतिम आराखडा जाहीर होईल. प्रभारी मुख्याधिकारी वैभव लोंढे यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय समितीने हा आराखडा जाहीर करण्यात आला.

बारा प्रभागात प्रत्येकी दोन प्रमाणे २४ नगरसेवक निवडून द्यायचे आहेत. त्यासाठीच्या प्रभाग आराखडा निवडणूक आयोगाच्या आलेल्या आदेशानुसार आज नागरिकांच्या माहितीसाठी जाहीर करण्यात आला. द्विभाग सदस्य प्रभाग रचना असून प्रत्येक प्रभागातून दोन नगरसेवकांची निवड केली जाणार आहे. याआधी असलेली नगरसेवकांची संख्या ही तेवढीच कायम राहणार आहे.

प्रभाग निहाय माहिती पुढील प्रमाणे-

प्रभाग १- येवले आखाडा, वामन वस्ती, पिंपळाचा मळा, राहुरी कॉलेज परिसर, आघाव वस्ती, एकनाथ नगर (लोकसंख्या ३५३२).प्रभाग २ - मुलन माथा, पोपळघट इस्टेट, सुराणाइस्टेट, मुंजोबा नगर, तनपुरे खळवाडी, दत्तनगर, भारत नगर. प्रभाग ३- मेहेत्रे मळा, घाडगे इस्टेट-घाडगे वस्ती, मेहेत्रे मळा, पांडुरंग



नगर, घाडगे इस्टेट, गुलदगड इस्टेट, तनपुरेवाडी रोडचा परिसर, अनमोल गणेश मंडळ परिसर, शाहू मंगल कार्यालय परिसर ,ताराचंद पाटील वस्ती,चौधरी वस्ती (२९५३ लोकसंख्या). प्रभाग ४ - बुवासिंद बाबा, संत भैरोबा मंदिर, रेणुका माता मंदिर, वीट भट्टी, व्यंकटेश मंदिर, पावन गणपती मंदिर, भवानी माता मंदिर परिसर व बुवासिंद बाबा दर्गा. प्रभाग ५- श्री संत सावता महाराज, आझाद चौक, जुनी स्टेट बँक, भागीरथीबाई शाळा, विद्यामंदिर शाळा परिसर, तुळजाभवानी माता मंदिर, सुलतान बाबा शहा, बाबा दर्गा परिसर (लोकसंख्या ३४७९).

प्रभाग ६ - शुक्लेश्वर मंदिर, उदावंत कॉम्प्लेक्स, हॉटेल अंजली परिसर, दीपक तनपुरे कॉम्प्लेक्स परिसर जैन श्वेतांबर मंदिर, ग्रामीण रुग्णालय परिसर, प्रगती शाळा नगरपरिषद कार्यालय व सेंट्रल बँक परिसर, सुराणा ब्रदर्स दुकान. प्रभाग ७ - गोकुळ कॉलनी, तहसील कार्यालय परिसर, पंचायत समिती परिसर, लक्ष्मी नगर, डावखर खळवाडी, योगा सेंटर बालाजी साडी सेंटर, हॉस्पिटल परिसर (लोकसंख्या -३४६८), प्रभाग ८- बिरोबा नगर- करपे इस्टेट, शितल थिएटर परिसर, भागीरथीबाई कॉलनी, शिक्षक बँक परिसर, सातपीर बाबा दर्गा, गाडगे महाराज आश्रमशाळा, भालचंद्र वसाहत राहुरी खरेदी विक्री संघ बस स्थानक- लोकसंख्या २९१६.

प्रभाग ९- जोगेश्वरी आखाडा -शाहू नगर, काळे आखाडा, पेंडसे वस्ती, एमआयडीसी, जोगेश्वरी आखाडा, राजश्री हॉटेल परिसर, सांगळे वस्ती. प्रभाग १० -श्रीकृष्ण मंदिर, वराळे वस्ती, सरोदे वस्ती, कोरडे वस्ती, श्रीकृष्ण मंदिर परिसर, बिहाणी प्लॉट, कोर्ट परिसर. प्रभाग ११- कृषी उत्पन्न बाजार समिती, राहुरी- केशर मंगल कार्यालय, साई मंगल कार्यालय, घाडगे इस्टेट, नगर मनमाड रोड, बीएसएनएल ऑफिस परिसर, पोस्ट. प्रभाग १२- राजवाडा, बालाजी मंदिर, जामा मशीद, मंदिर, राजवाडा इस्टेट, बालाजी मंदिर, खंडोबा मंदिर परिसर क्रांती चौक परिसर.

# कीर्तनकाराने थोरातांवर केलेली टीका जनता सहन करणार नाही : आ. तांबे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्यावर टिका करताना विरोधक सुध्दा जपून शब्द वापरतात. त्यामुळे संत-महात्म्यांची परंपरा असलेल्या महाराष्ट्रात स्वतः ला कीर्तनकार म्हणून घेणाऱ्या एका उध्दट व्यक्तीने त्यांच्या विषयी जे काही बोलले ते महाराष्ट्रातील कोणत्याही वारकरी संप्रदायातील किर्तनकारांना आवडलेले नाही. त्यामुळे कीर्तनकाराने थोरातांवर केलेली टीका जनता सहन करणार नाही, असे मत आ. सत्यजित तांबे यांनी व्यक्त केले.

> कालच्या तथाकथित कीर्तनकाराची टिका ही राजकीय तर आहेच, पण संगमनेरच्या सामाजिक घडीला बदनाम करणारी आहे. त्यामुळे संगमनेरची स्वाभिमानी जनता हे कधीही सहन करणार नाही.
>
> **– सत्यजित तांबे, आमदार**

सहकार, शिक्षण, कृषी, सांस्कृतिक सगळ्याच क्षेत्रात अग्रेसर असलेल्या संगमनेरचे नाव बदनाम करण्याचा काही घटना मागील काळात सातत्याने सुरु करण्यात आल्यात. या घटना फक्त राजकीय नाहीत किंवा फक्त थोरात साहेबांशीच संबंधित नाही, मध्यंतरी संगमनेरचे नाव देशभर प्रसिद्ध करणाऱ्या एका उद्योगपतीला त्याने होर्डिंगमुळे शहराचे विद्रुपीकरण होत असल्याचे बोलल्याबद्दल फार वाईट भाषेत



टीका सहन करावी लागली.

आज संगमनेरच्या सहकारी व सहकारी बँकांमधील ठेवी आज ७००० कोटींच्या घरात आहेत, संगमनेरात रोज ९ लाख लिटर दूध तयार होते. संगमनेरमधील दोनच गावात कुक्कुटपालनातून रोज ७ लाख अंडे तयार होतात. संगमनेर कारखाना राज्यातील एक उत्कृष्ट सहकारी साखर कारखाना म्हणून ओळखला जातो, संगमनेरमध्ये ५ मेडिकल कॉलेज आहेत. ज्यातील चार बाळासाहेब थोरातांच्या विरोधकांचे आहेत म्हणजेच येथे द्वेषाचे राजकारण नाही. संगमनेरात सगळ्या शिक्षण संस्था मिळून २५००० मुले-मुली उच्च शिक्षण घेतात. प्रवरा नदीला पाणी नसतांना संगमनेर शहराला पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करावी लागत होती. आता निळवंडे धरणातून २४ तास स्वच्छ पाणी भेटते.

हे काय उगाच झालेले नाही. पर्जन्य छायेच्या भागात असलेला व एके काळचा दुष्काळी तालुका आज सुजलाम सुफलाम झाला यात स्वातंत्र्य सेनानी स्व. भाऊसाहेब थोरात व त्यांच्या नंतर बाळासाहेब थोरात यांचे प्रचंड योगदान आहे. जे कोणीही शहाणा माणूस नाकारू शकत नाही.

## श्रीगोंद्यात शनि मारुतीची दहीहंडी उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : श्रीगोंदा शहर शनिचौक परिसरात कृष्ण जन्माष्टमीनिमित्त शनि मारुती मित्र मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी दहीहंडी उत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. मंडळाचे मानाचे दहीहंडीचे ७० वे वर्ष होते. तरुणाईने मोठ्या उत्साहाने यात सहभागी होत आनंद घेतला.

दहीहंडी उत्सव तरुणांसाठी आकर्षण राहिला आहे. शनिचौक कृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडी उभारण्यात आली होती. चोहोबाजूंनी पाण्याचे फवारे आणि ऑडियोच्या तालावर तरुणाई थिरकताना दिसली. दहीहंडी उत्सव मंडळाच्यावतीने सिदनकर फ्लोवर यांनी तिरंगी फुल तर एकदंत आकर्षक लाइट रोशनाईचा असा देखावा उभारण्यात आला होता. तब्बल चार तास हा उत्सव याठिकाणी सुरू होता. शहरातील दहिहंडी पथकाने तिसऱ्या थरावर हंडी फोड़त ३३,३३३ रुपये बक्षीस मिळवले. या कार्यक्रमास नगराध्यक्ष मनोहर पोटे, बापू माने, प्रवीण काळे, सागर भागवत, चंद्रकांत धोत्रे, वैभव मेथा, आनंद खेतमाळीस, अभिजित काळे, फारुक शेख यांची मंडळास मोलाची साथ लाभली.

कार्यक्रमावेळी श्रीगोंदा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांनी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# पिंपळनेर प्रतिष्ठाणकडून गुणवंतांचा सन्मान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : राज्यात सामाजिक, शैक्षणिक, कृषी व इतर क्षेत्रात कार्यरत असलेल्या पिंपळनेर सामाजिक प्रतिष्ठाणने पारनेर तालुक्यातील गुणवंतांना सन्मान चिन्ह, शाल, पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.

देशाचा स्वातंत्र्य दिनी जिल्हा परिषदेच्या श्री क्षेत्र पिंपळनेर येथील प्राथमिक शाळेत पारनेर तालुक्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंतांमध्ये एसबीआय लाईफ या आर्थिक गुंतवणूक क्षेत्रात उत्कृष्ठ कार्य करून कष्टकऱ्यांच्या घामाचा पैसा एसबीआय लाईफमध्ये गुंतवणूक करून त्यांना योग्य तो परतावा मिळून देण्याचे



काम केले व अनेकांना रोजगार उपलब्ध करून त्यांना रोजी रोटीसाठी मदत करणारे रांधे येथील व नगर जिल्हयात कार्यरत असलेले रविंद्र रोकडे यांना उत्कृष्ठ अधिकारी, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे प्राचार्य डॉ. सहदेव आहेर यांना उत्कृष्ठ प्राचार्य, केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या ३ परीक्षा उच्चांकी गुणांनी यश प्राप्त केलेले अभिजीत आहेर, सेवानिवृत्त झालेले हनुमंत काळोखे, तालुका स्तरीय शालेय सम ूह गायनमध्ये येथील संत निळोबाराय विद्यालयाने प्रथम क्रमांक पटकावला त्या विद्यार्थांचा सन्मान त्याचबरोबर वैष्णवी काळोखे, सिद्धांत गाजरे, सुरेश खोसे यांचा विशेष गौरव करण्यात आला.

सन्मान सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मच्छिंद्र गाजरे हे होते. तर सरपंच देवेंद्र लटांबळे, तुळशिराम कळसकर, सिताराम कळसकर, सुभाष गाजरे, रवि लटांबळे, भाऊसाहेब लटांबळे, माधव गाजरे, सुनिल रासकर, मुख्याध्यापक रामराव पवार, हनुमंत रासकर, संदीप गाजरे, संभाजी रासकर, गोरक्ष गाजरे, गोरख सावंत, चांगदेव शिर्के, संपतराव गाजरे, विजय गुगळे, गोपाळ मकाशिर, हर्षल गाजरे, तेजस गाजरे, सुरेश होले, राजू रासकर यांसह आदी उपस्थित होते.

# वृद्धेश्वर देवस्थान भक्ती शक्तीचे स्थळ

## राहुल राजळे; वृद्धेश्वर देवस्थानच्या स्वागत कमानीचा लोकार्पण सोहळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी** : पाथर्डी तालुका संतांची भूमी आहे. त्याचबरोबर श्री क्षेत्र वृद्धेश्वर देवस्थान भक्ती शक्तीचे अनन्यसाधारण व्यासपीठ असून या देवस्थानमुळेच तालुक्याची जिल्ह्यात नव्हे तर देशभरात ओळख आहे. वृद्धेश्वर देवस्थानमुळे मानवी जीवनाचे मोठे कल्याण झाले असून वृद्धेश्वर देवस्थान भक्ती सक्तीचे स्थळ असल्याचे प्रतिपादन वृद्धेश्वर साखर कारखान्याचे संचालक राहुल राजळे यांनी केले आहे.

राजळे कुटुंबियांच्या वतीने देवराई येथे वृद्धेश्वर देवस्थानसाठी स्वागत कमान उभारली असून या स्वागत कामानीचा लोकार्पण सोहळा राहुल राजळे यांच्या हस्ते पार पाडला. यावेळी ते बोलत होते.

यावेळी राहुल राजळे म्हणाले, वृद्धेश्वर देवस्थानच्या विकास कामात राजळे कुटुंब कधीही मागे राहिले नाही. यापुढे देखील वृद्धेश्वर देवस्थानच्या विकास कामासाठी सदैव तत्पर राहील.




या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी वृद्धेश्वर साखर कारखान्याचे संचालक सुभाष ताठे, सुभाष बुधवंत, वृद्धेश्वर देवस्थानचे अध्यक्ष गणेश पालवे, मुख्य कार्यकारी अधिकारी आर. जे. महाजन, बाळासाहेब मरकड, विनायक म्हस्के, नानासाहेब चोथे, शरद पडोळे, जनार्दन पालवे, विष्णू पाठक, विष्णू पालवे, मुरलीधर पालवे, अंबादास पाठक, आबासाहेब बोरुडे, सतीश पालवे, अंबादास पालवे, राजू पालवे, अशोक चोथे, लक्ष्मण पाठक, शिवाजी चोथे, सोमनाथ पाठक, दिलीप गोरे, शंकर पालवे, संभाजी पालवे, गणेश शिंदे, वसंत पाठक, अशोक कर्डिले यांच्यासह घाटशिरस देवराई येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संगमनेर-अहिल्यानगर रस्ता ठरतोय मृत्यूचा सापळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**झरेकाठी** : अहिल्यानगर जिल्ह्यातील शिबलापुर-गुहा फाटा हा फक्त २० किलोमीटरचा रस्ता असला तरी त्यावरून प्रवास करणे म्हणजे २० किमी नव्हे तर २०० किमीचा मृत्यूचा प्रवास वाटावा, अशी अवस्था झाली आहे.

> गुहा फाटा शिबलापुर या रस्त्यावरिल सुमारे ४० गांवचा हा रस्ता जिव्हाळ्याचा विषय असुन हा प्रश्न राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे तसेच युवा नेते सुजय विखे पाटील यांना लवकरच भेट घेऊन निवेदन देणार आहे. ते निश्चित मार्ग काढतील.
>
> **– सोमनाथ डोळे, बुथ प्रमुख भाजपा**

या मार्गावरून थेट संगमनेर-नगर ४० किमीचं अंतर पार करणाऱ्या प्रवाशांचा जीव अक्षरशः मुठीत घेऊन प्रवास सुरू आहे. पावसामुळे खड्डे पाण्याने भरले आहेत. त्यात डांबर उखडल्याने काही खड्ड्यांची खोली वाढली आहेत. कार, जीप, ट्रॅक्टर देखील अडकतात. दोनचाकी वाहनं तर घसरून थेट अपघाताला आमंत्रण देतात.

रस्त्यावरून जाणाऱ्या एका विद्यार्थ्याने सांगितले की, दररोज शाळेत जायचंय की मृत्यूला भेटायला निघायचंय,



हेच समजत नाही. एवढंच नव्हे तर आपत्कालीन सेवा देखील विस्कळीत झाल्या आहेत. रुग्णवाहिका घटनास्थळी वेळेत पोहोचत नाही. एखाद्या गंभीर अपघाताच्या ठिकाणी पोहोचताना वेळ गेल्याने जीव धोक्यात जातो. हा रस्त्यावरून प्रवास म्हणजे जीव वाचवायचा की संपवायचा, हा प्रश्नच नागरिकांना पडला आहे.

याशिवाय रस्त्याच्या दुतर्फा वेड्या बाभळीच्या काटेरी फांद्या, झुडुपं आणि इतर झाडांनी रस्ता गिळून टाकला आहे. साईट पट्ट्यांवर झाडं आल्याने वाहनचालकांना बाजूला जाणं अशक्य झालं आहे. अनेकदा ट्रॅक्टर, जीप किंवा अवजड वाहने आल्यावर समोरच्या वाहनाला धोकादायकरित्या मागे घ्यावं लागते.

शिबलापुर-गुहा हा रस्ता देवगाव जाखुरी, पिंपरणे, कनोली, ओझर, शेडगाव, हंगेवाडी, मालुजे, पानोडी, आश्वी दाढ, खुर्द, पिंप्री खळी, झरेकाठी, चनेगाव, निंभेरे, तांभेरे, सोनगाव, आनपवाडी अशा तब्बल ४० गावांचा मुख्य शिरा आहे. हजारो शालेय विद्यार्थी, शेतकरी, कामगार आणि व्यावसायिक दररोज या मार्गावरून प्रवास करत दळणवळण करतात. मात्र रस्त्याच्या दयनीय अवस्थेमुळे मुलांच्या शिक्षणावर, शेतकऱ्यांच्या उत्पादन विक्रीवर आणि सामान्य जनतेच्या रोजच्या जगण्यावर घाला बसला आहे.

# नेवासा नगरपंचायतीचा प्रारूप प्रभाग रचनेने उडाला गोंधळ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : नेवासा नगरपंचायत निवडणुकीच्या प्रारूप प्रभाग रचना विभागल्याने नेवासा शहरात राजकीय गोंधळ उडाला आहे.

नेवासा नगरपंचायत ही १७ प्रभागात विभागली आहे. २०१६ पासून सर्व उमेदवारांच्या डोक्यात बसलेली प्रभाग रचना प्रशासनाने मोडीत काढली. गेली तीन वर्ष प्रशासक राज असल्याने सर्व नगरसेवक, नगराध्यक्ष व इच्छुक नगराध्यक्ष यांची प्रशासनावर पकड राहिलेली नाही. आजच्या प्रभाग रचनेमुळे १७ पैकी कोणताही प्रभाग पूर्वीसारखा राहिलेला नाही. जुन्या प्रभागांचे या रचनेमुळे नंबर बदलल्या आहेत. या सर्वाचा परिणाम म्हणून नगरसेवकांना आपला मतदारसंघ कोणता हेच समजणे आता कठीण झालेले आहे. हरकतीसाठी १८ ऑगस्ट ते २१ ऑगस्टपर्यंत अशी फक्त तीन दिवसाची मुदत असल्याने मोठ्या प्रमाणावर हरकती नोंद होण्याची चिन्हे आहे.

### इच्छुकांची संख्या वाढली

निवडणुकीचे वारे लागताच गेल्या दोन-तीन महिन्यांपासून इच्छुक उमेदवारांनी मोर्चेबांधणी सुरू केली होती. यामध्ये प्रत्येकाने जनसंपर्क सुरू केला होता. मात्र सोमवारी जाहीर झालेल्या प्रभाग रचनेमुळे सगळ्यांचा गोंधळ उडाला आहे. दरम्यान नगराध्यक्ष पद सर्वसाधारण जागेला सुटल्याने इच्छुकांची संख्या पण वाढली आहे.

# वडाळा बंगला रस्त्याची दयनीय दुरावस्था

## स्थानिकांचा आंदोलनाचा इशारा; रस्ता दुरुस्त करण्याची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील वडाळामहादेव बसस्थानक ते जलसंपदा कार्यालय (वडाळा बंगला) या अर्धा किलोमीटर रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली असून प्रशासनाने या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम तातडीने सुरु करण्याची मागणी वडाळा महादेव सेवा संस्थेचे चेअरमन दिलीपराव पवार यांनी केली आहे.

वडाळा महादेव येथे जलसंपदा विभागाचे शाखा कार्यालय असलेने परिसरातील शेतकरी, जलसंपदा विभागाचे कर्मचारी यांची येथे मोठी वर्दळ असते, तर कार्यालयाच्या जवळच स्थानिक रहिवासी मोठ्या संख्येने वास्तव्यास आहेत. बसस्थानक चौक ते जलसंपदा कार्यालय हा साधारण अर्धा किलोमीटर रस्ता आहे.

इंग्रजांच्या काळात दगडमातीचा मोठा भराव टाकून हा

### ... अन्यथा रास्ता रोको आंदोलन करणार

पावसाने उघडीप दिल्यानंतर प्रशासनाने या रस्त्याचे काम तातडीने सुरु करावे, अन्यथा येथील रहिवाशांचे वतीने श्रीरामपूर-नेवासा रस्त्यावर रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिलीप पवार यांच्यासह येथील नागरिकांनी दिला आहे.



रस्ता तयार करण्यात आला होता. त्यानंतर १९९३ साली या रस्त्याचे काम जलसंपदा विभागाने केले होते. मात्र गेल्या ३२ वर्षांपासून या रस्त्यावरील एक खड्डेही जलसंपदा विभागाने बुजविले नाही. आजपर्यंत अनेकदा स्थानिक नागरिकांनी स्वखर्चाने या रस्त्यावरील खड्डे बुजविले.

सध्या या रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली आहे. या रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडल्याने चारचाकी वाहनेच काय, पण पायी चालणेही अवघड झाले आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या शेतकरी, कर्मचारी, शालेय विद्यार्थी तसेच स्थानिक रहिवाशांना मोठया गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. सध्या पाऊस सुरु असल्याने या रस्त्यावर प्रचंड चिखल झाला असून नागरिकांना चिखलातून वाट काढत जावे लागत आहे. अपघाताची शक्यता येथे निर्माण झाली आहे. अनेक लोकप्रतिनिधींनी या रस्त्याचे काम सुरु करण्याचे आश्वासन दिले, मात्र या रस्त्याच्या कामाला अद्यापही मुहूर्त मिळाला नाही.

# ५५ विद्यार्थ्यांची 'मॅकलॉईड' कंपनीत वर्णी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ग्रामीण भागातील उत्कृष्ठ महाविद्यालय म्हणून तिसऱ्यांदा गौरविलेले एकमेव महाविद्यालय असलेल्या पद्मश्री विखे पाटील महाविद्यालयामध्ये नुकत्याच मॅकलॉईड फार्मास्युटीकल्स प्रा. लि. मुंबई या कंपनीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या परिसर मुलाखतीमध्ये ५५ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना एवढ्या मोठ्या प्रमाणात नोकरीची संधी मिळाली ही अतिशय



अभिमानास्पद बाब असल्याचे महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. राम पवार यांनी सांगितले.

शिक्षण हे ग्रामीण परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे या विचार धारेवर गरीब, गरजू व होतकरु विद्यार्थी-विद्यार्थीनींना कालसुसंगत व दर्जेदार उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देऊन त्यांचे जीवनमान समृध्द व उन्नत व्हावे, या उद्देशाने सहकार महर्षी पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांनी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेअंतर्गत १९७१ मध्ये सुरु करण्यात आलेल्या या महाविद्यालयामध्ये आज तीन हजाल विद्यार्थी विविध विषयांमध्ये ज्ञानार्जन करीत आहेत.

> महाविद्यालयामध्ये परिसरातील बेरोजगार व शाळाबाह्य युवकांबरोबरच महाविद्यालयीन तरुण-तरुणींना रोजगारक्षम व्यावसायिक अभ्यासक्रमांचे ज्ञान संपादन करता येते.
>
> **– डॉ. राम पवार**

मुलाखती यशस्वीतेसाठी संस्थेचे ट्रेनिंग व प्लेसमेंट सेल समितीचे चेअरमन डॉ. हरिभाऊ डुबे, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब रणपिसे, डॉ. शांताराम चौधरी, डॉ. अनिल वाबळे, प्रा. छाया गलांडे, डॉ. आर. बी. गायकर, एकनाथ सरोदे आणि आप्पासाहेब शेळके यांनी अथक परिश्रम घेतले.

या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, डॉ. सुजय विखे पाटील, डॉ. सुस्मिता विखे पाटील, भारत घोगरे आदींनी अभिनंदन केले आहे.

# महिलांच्या आर्थिक स्थैर्यासाठी स्व. विखेंनी प्रयत्न केले

## प्रा. डॉ. उत्तमराव कदम; सिंधुताई विखे पाटील यांच्या सहाव्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : महिलांची समाजात आर्थिक प्रगती कशी करता येईल व या माध्यमातून त्यांना स्थैर्य प्राप्त होऊन या महिलांना स्वावलंबी बनविण्याचे महान कार्य स्व. सिंधुताई एकनाथराव विखे पाटील यांनी केले, असे प्रतिपादन प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक प्रा. डॉ. उत्तम राव कदम यांनी केले आहे.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रेरणेने आणि संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुष्मिता विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली लोणी येथील प्रवरा कृषी शास्त्र संस्थेत आयोजित सिंधुताई विखे पाटील यांच्या सहाव्या पुण्यतिथी कार्यक्रमात प्रा. डॉ. कदम बोलत होते.



यावेळी कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. दिलीप महाले, कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. निलेश दळे, कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आशिष क्षीरसागर, अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. चंद्रकला सोनवणे,सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

यावेळी प्रा. भाऊसाहेब घोरपडे आणि प्रा. स्वरांजली गाढे यांनी सिंधुताई विखे पाटील यांच्या कार्याबद्दल उपस्थितांना माहिती दिली.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. रमेश जाधव यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रविण गायकर, प्रा. संदीप पठारे, प्रा. शुभम मुसमाडे, कार्यलयीन अधीक्षक किशोर गुळवे आदींनी प्रयत्न केले.

## साकुरीत स्वामी अरुणनाथगिरीजी महाराजांचे किर्तन उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**



**राहाता** : श्री उपासनी कन्याकुमारी स्थान साकुरी येथे स्वामी अरुणनाथगिरीजी महाराज यांचे किर्तन सती लिलाताई उपासनी महाराज यांच्या प्रथम पुण्यस्मरणार्थ अडबंगनाथ संस्थान येथील मठाधिपती स्वामी अरूणनाथगिरीजी महाराज यांचे जाहीर किर्तन संपन्न झाले.

सती लिलाताई या श्री उपासनी महाराज यांच्या शिष्या असून श्री उपासनी महाराज यांच्याकडून त्यांनी अनुग्रह घेतला. आपले संपूर्ण जीवन सद्गुरू चरणी अर्पण केले. सद्गुरु सारिखा असता पाठीराखा ह्या अभंगाच्याद्वारे त्यांनी सती लिलाताईंचे जीवन वर्णन केले. सद्गुरु आपल्याला देवापर्यंत पोहचवतात म्हणून जीवनात सद्गुरु असणे अतिशय गरजेचे असल्याचे महाराजांनी सांगितले. श्री उपासनी कन्याकुमारी स्थानाने सर्व रूढी परंपरा जपल्या आहेत. हे जतन करणे फार कौतुकास्पद आहे. सती लिलाताईंचे जीवन आपल्या सर्वांसाठी नक्कीच आदर्श ठरले आहे. सदर कीर्तनास पंचक्रोशीतील ग्रामस्थ, भक्त उपस्थित होते. स्थानाच्या व्यवस्थापकीय विश्वस्त माधवीताईंनी पुन्हा दर्शनाचा योग यावा, असे मत व्यक्त केले.




# बालांगण

## परिभ्रमण का जाणवत नाही?

तुम्ही मित्र-मैत्रिणींसोबत गोल गोल फिरला किंवा एकमेकांचे हात धरून वेगाने गिरक्या घेतल्या तर काय होते बरं? अगदी बरोबर... आपल्याला चक्कर येऊ लागते. पण तुम्हाला माहिती आहे का की आपण राहतो ती पृथ्वी सूर्याभोवती सुमारे १०० मैल प्रति तास वेगाने फिरत आहे. पण इतक्या वेगाने फिरल्यानंतरही आपल्याला ते कळत नाही. दुसरीकडे, कमी वेगाने काही सेकंद गोल गोल फिरवल्यानंतरही आपल्याला चक्कर येऊ लागते. म्हणूनच पृथ्वीचे फिरणे आपल्याला का कळत नाही हे जाणून घ्यायला हवे.

मुलांनो, आपल्याला पृथ्वीचा वेग जाणवत नाही कारण आपण आणि सभोवतालच्या सर्व गोष्टी एकाच वेगाने फिरत आहोत. म्हणजेच चालत्या ट्रेनमध्ये बसणाऱ्या प्रवाशाला बाहेर पाहेपर्यंत ट्रेनचा वेग कळत नाही, त्याचप्रमाणे पृथ्वीवर आपण देखील त्याच वेगाने फिरत



असल्यामुळे काहीही जाणवत नाही.

**माहिती असावे**

**उर्मिला राजोपाध्ये**

दुसरे म्हणजे पृथ्वीची गुरुत्वाकर्षण शक्ती आपल्याला पृष्ठभागावर बांधून ठेवते. पृथ्वी अचानक थांबली तर आपण सर्वजण त्याच वेगाने पुढे जाऊ, जसे एखादी कार अचानक थांबते आणि प्रवाशांना धक्का बसतो. परंतु पृथ्वी एका स्थिर वेगाने फिरत असल्याने आपल्याला कोणताही धक्का किंवा बदल जाणवत नाही.

त्याबरोबर पृथ्वीचा आकार प्रचंड असल्यामुळेही तिचा परिभ्रमण वेग मंद वाटतो. म्हणजेच हा वेग ताशी १००० मैल असला तरी तो एका मोठ्या गोलात पसरलेला असल्याने, कोनीय वेग कमी आहे. पृथ्वीचे वातावरण देखील त्याच वेगाने फिरते, म्हणूनच आपल्याला त्याचा वेग जाणवत नाही. वातावरण पृथ्वीसोबत फिरले नसते तर आपल्याला सतत भयंकर वादळी वारे जाणवले असते. मानवी शरीर स्थिरतेसाठी बनलेले आहे. आपल्या कानातील संतुलन राखणारा भाग पृथ्वीच्या गतीशी जुळवून घेतो.

## झाडाच्या जतनासाठी...

दोस्तांनो, सध्या मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होताना दिसते. झाडं तोडल्यामुळे पृथ्वीवरचं तापमान वाढत चाललं आहे. प्रदूषणाचा प्रश्न आ वासून उभा राहिला आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना मास्क घालून फिरावं लागत आहे. घरांमध्ये हवा शुद्धिकरण यंत्रं बसवली जात आहेत. मात्र झाडं हा वातावरण शुद्ध करणारा नैसर्गिक स्रोत आहे. म्हणूनच काही देशांमध्ये हा हरित ठेवा टिकवून ठेवला जातो. इंग्लंडमधल्या लिव्हरपूलमध्ये एक हजार वर्षांपूर्वीचं ओकचं झाड आहे. हे झाड जपून ठेवण्यासाठी बरेच प्रयत्न केले जात आहेत. हा ओक वृक्ष अजून बरीच वर्षं जगावा यासाठी निधी गोळा करण्यात आला आहे. या झाडावर बरेच पैसे खर्च होत आहेत.



युरोपमध्ये अनोख्या स्पर्धेचं आयोजन केलं जात आहे. या स्पर्धेत झाडं सहभागी होतात. यापैकी एका झाडाला 'ट्री ऑफ द ईयर' हा पुरस्कार दिला जातो. २०२० मध्ये होणाऱ्या 'युरोपियन ट्री ऑफ द ईयर' स्पर्धेत हे ओकचं झाड सहभागी झालं होतं. 'ट्री ऑफ द ईयर' ठरण्यासाठी या झाडाला बरीच मतं मिळणं गरजेचं आहे. ऐतिहासिक महत्त्व असणाऱ्या

**जागरुक व्हा**

झाडांना या स्पर्धेत सहभागी करून घेतलं जातं. लिव्हरपूलमधला हा ओक वृक्ष ऐतिहासिक ठेवा आहे. म्हणूनच त्याचं जतन करण्यासाठी इथलं प्रशासन बरीच मेहनत करत आहे.




## असा आहे पृथ्वीचा शेजारी

दोस्तांनो, आपल्या सूर्यमालेतला लाल रंगाचा ग्रह म्हणजे मंगळ. या मंगळाबद्दल पृथ्वीवासीयांना प्रचंड कुतूहल आहे. मंगळावर जीवसृष्टी आहे का, याचा शोध लावला जात आहे. भारताच्या इस्रो या अंतराळ संशोधन संस्थेसह अमेरिकेची नासा ही संस्थाही मंगळाच्या पृष्ठभागाचा अभ्यास करत आहे. तुम्हा लहानग्यांचा बालदिन असतो. त्याचप्रमाणे मंगळाचाही खास दिवस आहे. या दिवसाला 'रेड प्लॅनेट डे' असं म्हटलं जातं. २८ नोव्हेंबर हा दिवस 'रेड प्लॅनेट डे' म्हणून पाळला जातो. २८ नोव्हेंबर १९६४ या दिवशी मॅरिनर नावाचं अंतराळयान आकाशात झेपावलं. याच कारणामुळे २८ नोव्हेंबर हा दिवस रेड प्लॅनेट डे म्हणून साजरा होऊ लागला. मंगळाचा पृष्ठभाग खडकाळ आहे. लाल रंगामुळे मंगळाला रेड प्लॅनेट म्हटलं जातं. 'रेड प्लॅनेट डे'ला तुम्ही बरंच काही करू शकता. रात्री

**जाणून घ्या**


**वीणा देशमुख**

निरभ्र आकाशाकडे डोळे लावून बसा. तुम्हाला लाल रंगाचा हा ग्रह म्हणजे मंगळ दिसेल. हे शक्य नसेल तर मंगळाबाबत माहिती मिळवा. अंतराळाची माहिती देणारी पुस्तकं वाचा. इंटरनेटवरही तुम्हाला भरपूर माहिती मिळू शकते. मंगळ हा सूर्यमालेतला चौथ्या क्रमांकाचा ग्रह. म्हणजेच पृथ्वीचा शेजारी आहे. त्यामुळे मंगळावर जीवसृष्टी असेल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



## नकारात्मकता घालवण्यासाठी...

मुलांनो, विविध कामांसाठी शरीराला ऊर्जेची गरज असते. आपण खात असलेल्या अन्नपदार्थांमुळे शरीराला ऊर्जा मिळते. नियमित व्यायामामुळे आपण तंदुरुस्त होतो. ही असते शारीरिक तंदुरुस्ती. मात्र आपले विचार, भावना आणि लोकांशी साधला जाणारा संवाद आपल्या सर्वांगिण आरोग्यावर परिणाम करत असतो. आपल्या आसपास बरीच नकारात्मकता असते. लोक नकारात्मक विचार व्यक्त करत असतात. मात्र या सगळ्यापासून स्वत:ला लांब ठेवणं खूप गरजचेचं असतं. यासाठी नेमकं काय करता येईल? जाणून घेऊ.



✻ सतत नकारात्मक बोलणाऱ्या, इतरांचा अपमान करणाऱ्या, आयुष्याबद्दल तक्रार करणाऱ्या माणसांपासून लांब रहा. स्वत:च काही सीमारेषा आखा. तुमच्याकडे करण्यासारखं बरंच काही आहे हे लक्षात ठेवा. या नकारात्मकतेच्या जाळ्यात अडकू नका.

**लाईफस्टाईल**

**आरती देशपांडे**

✻ तुम्हाला प्रोत्साहन देणारा एखादा मंत्र तयार करा. तुमच्या आसपास बरंच काही चुकीचं घडत असतं. पण हे इतरांचे विचार आहेत; माझे नाहीत, मला खूप पुढे जायचं आहे असं घोकत रहा.


✻ तुमच्या विचारशक्तीला चालना द्या. तुम्ही पांढऱ्या आणि निळ्या रंगाच्या फुग्यामध्ये बसला आहात असा विचार करा. आता दुसऱ्यांचे नकारात्मक शब्द, विचार या फुग्याला आपटून पुन्हा त्यांच्याकडेच जात आहेत. या विचारांचा तुमच्यावर काहीच प्रभाव पडत नाही, असं समजा. यामुळे इतरांच्या विचारांचा तुमच्यावर काहीच प्रभाव पडणार नाही.

✻ आपल्या घरात किंवा खोलीत बराच कचरा पडलेला असतो. काही वस्तू उगाचच ठेवलेल्या असतात. यामुळे नकारात्मकता वाढत जाते. यासाठी तुमची खोली वेळावेळी आवरा. स्वत:ला ही सवय लावून घ्या. खोलीत उगाचच वस्तूंची गर्दी करू नका. यामुळे तुम्हालाही प्रसन्न वाटेल.

## ऑनलाईन मैत्र टिकवण्यासाठी...

मुलांनो; तुम्ही फेसबुक, इन्स्टाग्रामसारख्या सोशल मीडिया ॲप्सचा वापर करत असाल. यावर तुमचे बरेच फ्रेंड्स असतील. पण काही चुकांमुळे तुमच्या मित्रांची संख्या कमी होऊ शकते.

✻ अनोळखी लोकांच्या फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नका. हे लोक तुमच्या मित्रांना फ्रेंड रिक्वेस्ट पाठवू शकतात. यामुळे काही लोक तुम्हाला अनफॉलो करू शकतात.





**टेक नॉलेज**

✻ सोशल साईटवरून मीम्स शेअर करतात. पण या मीम्सचा अनेकांना कंटाळा येतो. त्याऐवजी चांगली माहिती शेअर करा. यामुळे तुमचे फ्रेंड्स टिकून राहतील. शिवाय त्यांची संख्याही वाढेल.


✻ सोशल साईट्सवरून वेगवेगळ्या गेम्सच्या रिक्वेस्ट पाठवल्या जातात. पण तुमच्या फ्रेंड्स लीस्टमधला प्रत्येकजण हे गेम्स खेळत असेल असं नाही. अशा रिक्वेस्टना अनेकजण वैतागतात. त्यामुळे शक्यतो अशा रिक्वेस्ट पाठवू नका. तुमची वैयक्तिक माहिती सतत शेअर करू नका. याचा इतरांना कंटाळा येऊ शकतो. तुम्हाला अनफॉलो करू शकतात.

**ठिपके जुळवा**



## तमिळनाडूची शान

कोईंबतूरला दक्षिणेचं मँचेस्टर म्हटलं जातं. कोईंबतूर हे तमिळनाडूमधलं तिसऱ्या क्रमांकाचं मोठं शहर आहे. नोय्यल नदीच्या किनारी वसलेलं हे शहर निलगिरी पर्वताच्या पायथ्याशी आहे. इथली स्थानिक देवता कोनियाम्मनच्या नावावरून या शहराला कोईंबतूर हे नाव मिळालं. बंगलोर, पुणे या शहरांप्रमाणेच कोईंबतूर हे आयटी हब बनून गेलं आहे. हे वस्त्रोद्योगाचं मोठं केंद्र आहे. इतकंच नाही तर इथे बरीच इंजिनिअरींग महाविद्यायलं आहेत. त्यामुळे कोईंबतूरला शिक्षणाचं माहेरघर म्हटलं जातं. तमिळनाडूच्या जडणघडणीत कोईंबतूरचा मोठा वाटा आहे. या शहराच्या आसपास बरेच धबधबे आहेत. सिरुवनी हा इथला प्रसिद्ध धबधबा आहे. कोईंबतूरची लोकसंख्या २.४ दशलक्ष इतकी आहे. उटी, कुन्नूर, वालपराईसारखी पर्यटनस्थळं कोईंबतूरपासून हाकेच्या अंतरावर आहेत. त्यामुळे या शहरात पर्यटकांची गर्दी झालेली असते.



**सफर शहरांची**

## बायोकेमिकल इंजिनिअरींगचा विचार करा

इंजिनिअरींगच्या विविध शाखा आहेत. त्यापैकी एक म्हणजे बायोकेमिकल इंजिनिअरींग. केमिकल इंजिनिअरींग, मायक्रोबायोलॉजी आणि बायोकेमिस्ट्रीच्या अभ्यासासाठी इंजिनिअरींगची ही शाखा तयार करण्यात आली आहे. बायोकेमिकल इंजिनिअर्स सेल्स व्हायरस, प्रोटिन्स तसंच इतर बायप्रोडक्टसच्या विकासासाठी, यांच्या विकासात येणारे अडथळे दूर करण्यासाठी प्रयत्नशील असतात. बायोकेमिकल इंजिनिअरींगअंतर्गत तुम्ही बायोकेमिस्ट्री, बायो आंत्रप्रिनरशीप, बायो प्रोसेस, एन्व्हायर्न्मेंटल स्टडीजसारख्या विविध विषयांचा अभ्यास करू शकता. या शाखेत प्रवेश घेण्यासाठी तुम्हाला विविध प्रवेश परीक्षा द्याव्या लागतात. पदवी मिळवल्यानंतर तुम्ही मास्टर्स तसंच पीएचडीही करू शकता.




**कोण होणार?**

बायोकेमिकल इंजिनिअर्स रंग, बायो फ्युअल, अल्कोहोल, स्टेरॉइड्स, एंझाइम्स, बायो फर्टिलायझर्सची निर्मिती करणाऱ्या कंपन्यांमध्ये काम करतात.

## वडा होतो कुरकुरीत

गरम सांभारात बुडवलेला कुरकुरीत वडा... अहाहा! विचार केला तरी तोंडाला पाणी सुटते, नाही का? मुलांनो, हा फक्त एक चविष्ट नाश्ता नाही तर दक्षिण भारताची ओळखही आहे. तुम्हीही या पदार्थाचा असंख्य वेळा आस्वाद घेतला असेल. पण मेदूवड्याच्या मध्यभागी गोल छिद्र का असते हे तुम्हाला माहिती आहे का? मित्रांनो, हे फक्त डिश सुंदर दिसण्यासाठी नाही हे प्रथम जाणून घ्या.



**वाचा तर खरं**

**पंकजा देव**

वड्याचे पीठ खूप जाड असते. ते छिद्राशिवाय गोल बनवले तर बाहेरील थर लवकर शिजेल आणि कुरकुरीत होईल, परंतु असे केल्यास आतील भाग कच्चा राहतो. तो नीट शिजत नाही. छिद्रामुळे गरम तेल वड्याच्या आतील पृष्ठभागावर सहजपणे पोहोचू शकत असल्यामुळे वडा आतून आणि बाहेरून समान पद्धतीने शिजतो.

वडा तेलात तळला जातो तेव्हा छिद्रांमुळे तो सर्व बाजूंनी कुरकुरीत होतो. आतूनही तेलाच्या संपर्कामुळे वड्याची पोत खूप कुरकुरीत होते. छिद्र नसतील तर वडा बाहेरून कुरकुरीत असला तरी आतून मऊ राहू शकतो. तसेच तळल्यानंतर वडा तेलातून बाहेर काढला जातो. असे करताना छिद्रांमुळे अतिरिक्त तेल सहजपणे बाहेर पडते आणि वडा कमी तेलकट होतो. खाण्यास हलकाही वाटतो. वडा चिकट्ही होत नाही.

वड्यातील छिद्राचा आणखी एक फायदा म्हणजे तुम्ही सांभार किंवा चटणीमध्ये वडा बुडवता तेव्हा सांभार आणि चटणीची चव छिद्रातून वड्याच्या आत पोहोचते आणि ही डिश अधिक रुचकर लागते.

**दोस्त हे मस्त**

### प्लॅटिपस पेरी



छोट्यांनो, प्लॅटिपस पेरी हा अनोखा प्राणी आहे. त्याची चोच बदकासारखी असते. त्याचे पायही विचित्र असतात. हा प्राणी दिसायला खूपच विचित्र असतो. प्लॅटिपस पेरी नर विषारी असतात. हा प्राणी जमिनीसोबतच पाण्यातही रहातो. या प्राण्यांना पोहायला खूप आवडतं. पायांच्या विशिष्ट रचनेमुळे त्यांना पाण्यात पोहणं सोपं होतं. हा प्राणी पाण्यात शिकार करतो. ऑस्ट्रेलियाच्या २० सेंटच्या नाण्यावर प्लॅटिपसचं पेरीचं चित्र आहे.

**खादाडी**

### मस्त स्ट्रॉबेरी क्रॅकर

दोस्तांनो, तुम्हाला स्ट्रॉबेरी आवडत असेल. या आंबटगोड फळात भरपूर पोषक घटक असतात. म्हणूनच तुम्ही स्ट्रॉबेरीपासून छान छान पदार्थ बनवू शकता. स्ट्रॉबेरी क्रॅकर्स हा पदार्थ खूप मस्त लागेल. स्ट्रॉबेरी क्रॅकर्स बनवण्यासाठी दोन स्ट्रॉबेरी, दोन मोठ्या आकाराची बिस्किटं आणि दोन चमचे फ्रेश क्रीम असं साहित्य घ्या. स्ट्रॉबेरीचे तुकडे करा. त्यात फ्रेश क्रीम घाला. आता हे मिश्रण एका बिस्किटावर पसरा. त्यावर दुसरं बिस्किट ठेवा. तुमचं स्ट्रॉबेरी क्रॅकर तयार आहे!



**स्टडी टिप्स**

### उद्दिष्ट ठरवा

छोट्यांनो, कोणत्याही उद्दिष्टाशिवाय केलेला अभ्यास लक्षात रहात नाही. त्यामुळे एकाच दिवशी वेगवेगळ्या विषयांचा अभ्यास करण्यापेक्षा एका विषयाची निवड करून तयारीला लागा. एका विषयाचा किती अभ्यास करायचा हे ठरवा. एक उद्दिष्ट ठरवा. आज दोन धडे पूर्ण करायचे आहेत, असं ठरवून अभ्यासाला लागा. यामुळे हे दोन धडे तुमच्या नीट लक्षात राहतील.



**योगा टाईम**

### लाभ त्रिकोणासनाचे

योगासनांमुळे ताणतणाव कमी व्हायला मदत होते. त्रिकोणासन हे असंच एक आसन आहे. यामुळे पाठीचा कणा बळकट होतो. विविध दुखणी कमी होतात. त्रिकोणासन केल्याने वजनही कमी होतं. हे आसन थोडं कठीण असलं तरी याचे बरेच लाभ आहेत. त्यामुळे त्रिकोणासन नियमितपणे करायला हवं.



दैनिक जनता आवाज

बुधवार, दि. २० ऑगस्ट २०२५ । अहिल्यानगर । पान नं. ८

# पती–पत्नींना मिळाला पुरस्कार




**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** येथील सामाजिक क्षेत्रामध्ये गेल्या २५ र्षांपासून सातत्याने सहभागी होत असलेले लालासाहेब जिजाबा वाघमारे आणि त्यांच्या पत्नी जयश्री लालासाहेब वाघमारे या दोघांनाही छत्रपती शासन समाजभूषण आदर्श पुरस्कार, जिजाऊ मासाहेब व लखोजीराजे जाधव यांचे वंशज शिवाजीराजे जाधव यांच्या हस्ते देण्यात आला.

तानाजी मालुसरे यांची वंशज कुणाल मालुसरे, हंबीरराव मोहिते यांचे वंशज राहुल राजे मोहिते, गणूजी शिर्के यांची वंशज हृतिक राजेशिर्के, व छत्रपती शासन ग्रुप हिंदुस्तान या राष्ट्रीय सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्राणजीत गवंडी व संस्थेचे प्रवक्ते संजय कुमार राजे घोरपडे तसेच पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष दादासाहेब तनपुरे आणि राज्याचे पदाधिकारी यांच्यासह अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी सिद्धार्थ वसतिगह यांच्या माध्यमातून संस्थेचे अध्यक्ष मानस सचिव यांच्या मार्गदर्शनाखाली, लालासाहेब वाघमारे व त्यांच्या पत्नी जयश्री हे मागील अनेक वर्षांपासून सातत्याने काम करत आहेत.

# ‘आत्मदीप‘मध्ये ‘फुले’ योजनेचे लोकार्पण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** नेवासाफाटा येथील आत्मदीप मेडिकल फाऊंडेशन संचलित आत्मदीप मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये आयुष्यमान भारत व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेसह नवीन डायलिसिस युनिटचे लोकार्पण देवगड संस्थानचे प्रमुख महंत भास्करगिरी महाराज व आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या हस्ते करण्यात आले.

नेवासा फाटा येथील आत्मदीप मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या प्रांगणात झालेल्या लोकार्पण सोहळयाच्या प्रसंगी अहिल्यानगर येथील साईदीप सह्याद्री हॉस्पिटलचे चेअरमन डॉ. एस. एस. दिपक कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. तर आमदार विठ्ठलराव लंघे, नागेबाबाचे कडूभाऊ काळे, पंचगंगाचे प्रभाकर शिंदे, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष युवा नेते सचिन देसरडा, तालुकाध्यक्ष प्रताप चिंधे, डॉ. वैभव शेटे, डॉ. करणसिंह घुले, योजनेचे विभागीय व्यवस्थापक डॉ. वसीम शेख, जिल्हा समन्वयक डॉ. रोहित कारंडे, आत्मदीप मेडिकल फाऊंडेशन श्वास फार्माचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अविनाश काळे व्यासपीठावर उपस्थित होते.यावेळी डॉ.अविनाश काळे यांनी स्वागत करून प्रास्ताविक केले. आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे, साईदीप सह्याद्री हॉस्पिटलचे चेअरमन डॉ. एस. एस. दीपक, आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, प्रभाकर शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले.

# व्यवसाय प्रशिक्षण स्वावलंबनाचा शाश्वत मार्ग

## आ. आशुतोष काळे; महिलांसाठी घरगुती व्यवसाय प्रशिक्षण शिबीर

आजच्या बदलत्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत महिलांनी स्वबळावर उभं राहणं हे काळाची गरज आहे. त्यासाठी कौशल्याधिष्ठित प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचं ठरतं. महिलांसाठी आयोजित करण्यात आलेलं घरगुती व्यवसाय प्रशिक्षण शिबीर म्हणजे त्यांना आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने घेऊन जाणारं एक प्रभावी पाऊल असल्याचे आ. काळे यांनी सांगितले.

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** महिलांना स्वत:च्या पायावर उभे करून आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी प्रियदर्शनी इंदिरा महिला मंडळाच्या अध्यक्षा पुष्पाताई काळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रियदर्शनी इंदिरा महिला मंडळ काम करीत आहे. ही प्रेरणा घेवून पुष्पाताई काळे यांच्या मार्गदर्शनाखाली नवक्रांती स्किल डेव्हलपमेंट सेंटरच्या वतीने महिलांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी वेळोवेळी आयोजित करण्यात



येणारे घरगुती व्यवसाय प्रशिक्षण शिबीर महिलांसाठी आर्थिक स्वालंबनाचा शाश्वत मार्ग असल्याचे प्रतिपादन आ.आशुतोष काळे यांनी केले.

प्रियदर्शनी इंदिरा महिला मंडळ व नवक्रांती स्किल डेव्हलपमेंट सेंटर कोपरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने कोपरगाव शहरात महिलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या ‘मोत्याची रांगोळी व पाण्यावर तरंगणारे दिवे’ तयार करण्याच्या एकदिवसीय शिबिराचे उदघाटन आ. आशुतोष काळे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. ते म्हणाले की, महिलांमध्ये असलेल्या कलात्मक आणि व्यावसायिक क्षमतेला चालना देण्यासाठी स्थानिक पातळीवर प्रशिक्षण शिबिराचे असे उपक्रम प्रियदर्शनी इंदिरा महिला मंडळ व नवक्रांती स्किल डेव्हलपमेंट सेंटरच्या माध्यमातून राबवले जातात हि अभिमानास्पद बाब आहे.

याप्रसंगी नवक्रांती स्किल डेव्हलपमेंट सेंटरच्या संचालिका राजश्री बागुल, चंद्रकांत बागुल, प्रशिक्षक मयुरी रणभोर, हेमा तवरेज, किरण बिडवे, यश करिअर अकॅडमीचे प्रमुख वाल्हे आदी उपस्थित होते.

# खर्डा येथे श्रावण रुद्रपूजा उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**खर्डा :** खर्डा येथे श्रावण महिना म्हणजे भक्तिभाव, पूजा-अर्चा आणि आध्यात्मिकतेचा संगम. या पवित्र महिन्यातील चौथ्या सोमवारनिमित्त खर्डा शहरात आर्ट ऑफ लिव्हिंग खर्डा, वैदिक धर्म संस्थान बेंगलोर व श्री मोरेश्वर (मोरप्पा महादेव) मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रूद्रपूजा, कीर्तन आणि महाप्रसादाचा सोहळा पारंपरिक व वैदिक पद्धतीने उत्साहात संपन्न झाली.

खर्डा हे ऐतिहासिक व धार्मिक वारसा लाभलेले शहर आहे. येथे जागृत बारा प्रति ज्योतिर्लिंगांपैकी एक श्री मोरेश्वर (मोरप्पा महादेव) मंदिर असल्यामुळे परिसरातील भाविकांचे हे केंद्रस्थान ठरले आहे. सोमवारी सकाळपासून मंदिर परिसरात भाविकांची मोठी गर्दी उसळली होती.

# तिसगावमध्ये ग्रामसेवकाचा तिढा सुटेना

## उपसरपंचासह सदस्यांचा उपोषणाचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी :** राजकीय दृष्ट्या महत्वपूर्ण ठरणाऱ्या तिसगाव ग्रामपंचायतचा ग्रामसेवकांचा तिढा काही केल्याने सुटेना. त्यामुळे उपसरपंचासह आठ ग्रामपंचायत सदस्यांनी गुरुवारी पंचायत समिती कार्यालयामध्ये उपोषणास बसण्याचा इशारा दिला आहे.

ग्रामसेवक अकोलकर यांची तिसगावला ग्रामसेवक म्हणून बदली झाली. त्यानंतर पुन्हा रात्रीतून ढाकणे यांचा आदेश काढण्यात आला. प्रशासन जाणीवपूर्वक तिसगावकरांना वेठीस धरत असून अकोलकर यांनी तिसगावचा चार्ज घेऊन आठ दिवस झाले. त्यांच्याबाबत कोणत्याही ग्रामस्थांची तक्रार नसताना त्यांची तिसगावमधून उचलबांगडी का करण्यात आली?. या उचलबांगडीचे कारण काय तर सरपंच मुनिफा शेख यांनी अर्जाद्वारे ढाकणे यांच्याकडेच तिसगावचा चार्ज ठेवण्याचा मागणी अर्ज केला असल्याचे गटविकास अधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

मात्र, उपसरपंचसह इतर ग्रामपंचायत सदस्यांना विश्वासात न घेता ढाकणे यांच्याकडे तिसगावचा चार्ज देण्याची एवढी घाई कोणासाठी आणि कशासाठी? असा सवाल उपसरपंच पंकज मगर यांनी उपस्थित केला आहे. त्यामुळे उपसरपंचासह सुमारे आठ सदस्यांनी व काही ग्रामस्थांनी



पंचायत समितीला निवेदन देऊन अकोलकर यांचीच नेमणूक तिसगावसाठी करावी अन्यथा गुरुवारी पंचायत समिती कार्यालयासमोर अमरण उपोषणास बसण्याचा इशारा निवेदनाद्वारे चेअरमन बाळासाहेब पाटील लवांडे, उपसरपंच पंकज मगर,ग्रामपंचायत सदस्य बिस्मिल्ला पठाण, रजिया शेख, फरहद शेख, संगीता गारुडकर, मुमताज शेख, सुरेखा लवांडे, सिकंदर पठाण, कल्पना नरवडे, शबाना शेख, वाल्मीक गारुडकर यांनी गटविकास अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

# भाजपा जिल्हा उपाध्यक्षपदी सागडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** तालुक्यातील वडूले बुद्रुक येथील उद्योजक अमोल सागडे यांची भाजपाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. भाजपाचे दक्षिण विभागाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग यांनी नुकतीच दक्षिणेतील ४० जिल्हा पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर केली आहे. सागडे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांचे समर्थक कार्यकर्ते आहेत. पक्षश्रेष्ठींनी दिलेली जबाबदारी समर्थपणे पेलवू तसेच सर्वांना बरोबर घेऊन पक्ष वाढीसाठी प्रामाणिक प्रयत्न करू, अशी प्रतिक्रिया सागडे यांनी दिली.

# पुणतांब्यातील अंतर्गत रस्त्यांची दुरावस्था

## ग्रामपंचायतीतील राजकारणाचा फटका बसतोय ग्रामस्थांना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणतांबा :** पुणतांबा गावातील अंतर्गत रस्त्याची दुरावस्था झाली आहे. कमलापूर गल्ली येथील मुख्य रस्त्यातर मृत्यूचा सापळा बनला आहे. या रस्त्यावर पायी चालणे देखील मुश्किल झाले आहे. ग्रामपंचायतीने याकडे दुर्लक्ष केले असून निवडणूक आल्यावर रस्त्याची आठवण येते का? असा प्रश्न परिसरातील ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

कमलापूर गल्लीतील मुख्य रस्त्यावर वाहतूक मोठ्या प्रमाणावर आहे. न्यू इंग्लिशकडे आठवडे बाजाराकडे जाणारा



हा रस्ता असून त्यावर मोठ्या चिखल असल्यामुळे या रस्त्यावर पायी चालणे देखील अवघड बनले आहे. या रस्त्यासाठी ग्रामपंचायतला वेळोवेळी तक्रार करून देखील रस्त्याची दुरुस्ती केली नाही. हा रस्ता जाणीवपूर्वक ठेवला का काय? असा प्रश्न ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

गावाचे नेतृत्व करणाऱ्यांनी प्रभागात रस्ते करून घेतले. हा रस्ता मुद्दामहून दुर्लक्षित ठेवला आहे. आमदार आशुतोष काळे यांच्या निधीतून अंतर्गत रस्त्यासाठी निधी मिळवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. कमलापूर गल्ली भागातील ग्रामपंचायत सदस्य आमदार काळे गटाचे असून त्यांना देखील याबाबत सांगितले. मात्र ग्रामपंचायत सत्ताधारी ऐकत नाही अशी कारणे ते देतात. प्रभागातील ग्रामपंचायत सदस्यांनी याचा प्रश्न मार्गी लावला पाहिजे. मात्र सत्ताधारी व विरोधक यामध्ये संघर्ष चालू आहे. यामध्ये मात्र ग्रामस्थांचे मोठे हाल होत आहे.

# नगर–मनमाडच्या कामासंदर्भात कोल्हार ग्रामपंचायत आक्रमक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार :** नगर– मनमाड महामार्ग कामासंदर्भात कोल्हार ग्रामपंचायतीचे पदाधिकारी आक्रमक झाले आहेत. सदर रस्त्याचे काम लवकर पूर्ण न केल्यास कोल्हार भगवतीपूर व परिसरातील ग्रामस्थांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

कोल्हार बुद्रुक व कोल्हार भगवतीपूर ही राहाता तालुक्यातील अग्रगण्य बाजारपेठ असून तसेच शिर्डी व शनिशिंगणापूर हे जागतिक दर्जाचे देवस्थान याच महामार्गवर आहे. गेल्या वीस वर्षापासून नगर–मनमाड रस्त्याचे काम सुरू असून अद्यापही ते पूर्ण झालेले नाही. या काला कालावधीमध्ये अनेक लोकांना आपले प्राण गमवावे लागले. प्रवरा नदीवरील पुलाची अतिशय दयनीय स्थिती झाली आहे. पुलावर असलेल्या खड्ड्यांमुळे वारंवार अपघात होऊन सलग आठ ते दहा तास वाहतूक कोंडी होत असल्यामुळे कोल्हारकडे येणाऱ्या भाविकांचे, दवाखान्यात येणाऱ्या रुग्णांचे शाळा



कॉलेजला जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे कोल्हार येथे खरेदीसाठी येणाऱ्या लोकांचे प्रचंड हाल होत आहे. तसेच कोल्हार भगवतीपूर ची बाजारपेठ यामुळे पूर्णपणे उध्वस्त झाली आहे.

अनेक वेळा शासकीय पातळीवर निवेदन देऊन देखील काही सुधारणा झालेली नाही.त्यामुळे कोल्हार येथील ग्रामस्थ तसेच व्यापारी असोसिएशन व ग्रामपंचायत यांनी संयुक्तरीत्या एक निवेदन नगर मनमाडरोडचे प्रोजेक्ट डायरेक्टर धनेश स्वामी यांच्या नावे जारी केले आहे. यामध्ये प्रवरा नदीवरील जुन्या पुलाची कायमस्वरूपी दुरुस्ती व नवीन पुलाचे काम तातडीने सुरू करावे, अन्यथा नाईलाजास्तव कोल्हार भगवतीपूर व परिसरातील ग्रामस्थांना मोठे आंदोलन करावे लागेल, याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल, असा इशारा देण्यात आला आहे.

येणाऱ्या काळात सर्व स्तरावर विचार विनिमय करून सदर जबाबदार सरकारी यंत्रणांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची तयारी ठेवणार असल्याचे कोल्हार बुद्रुकचे माजी सरपंच ॲड. सुरेंद्र खर्डे पाटील यांनी स्पष्ट शब्दात इशारा दिला आहे.

### ...सर्व शंकांचे निरसन करा

सदर रस्त्याच्या कामाबाबत साईड गटार, सीडी वर्क यासंदर्भात नागरिकांच्या मनात अनेक शंका आहेत. या शंकेचे निरसन करण्यासाठी आपल्या कार्यालयाचे एक सक्षम अधिकाऱ्याने ग्रामपंचायत कोल्हार बु. येथे येऊन सर्व शंकांचे निरसन करावे, असे देखील सदर निवेदनात स्पष्ट म्हटले आहे.

# पुलाचे काम सुरू करण्यासाठी ग्रामस्थांची जलसमाधी

## जोहरापूर–देवटाकळी मार्गावरील पूलाचा भराव वाहून गेल्याने ग्रामस्थ आक्रमक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील जोहरापूर देवटाकळी या साडेतीन कोटी रुपये खर्चाच्या रोडवरील पलाचे काम चालू असतांना पुलाच्या बाजूने रहदारीसाठी केलेला संमातर मातीचा भराव वाहून गेल्याने जोहरापूर- देवटाकळी या रोडवरील सर्व वाहतूक ठप्प झाली. या रोडवरील पुलाचे काम त्वरित सुरू करा, या मागणीसाठी आज देवटाकळी येथील ग्रामस्थ आक्रमक झाले व त्यांनी पाण्यात उतरून जलसमाधी आंदोलन केले.

सुमारे दोन तास चाललेल्या या जलसमाधी आंदोलनामध्ये देवटाकळी येथील ग्रामस्थ आक्रमक झाले होते. यावेळी बोलताना ग्रामस्थांनी सांगितले की विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी रस्ता नाही, शेतात अवजारे, वाहने घेऊन जाण्यासाठी रस्ता नाही. त्यामुळे शेतीही पडीक पडण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे ह्या पुलाचे काम तत्काळ सुरू करावे, अन्यथा आम्ही पाण्यातून उठणार नाही असा आक्रमक पवित्रा यावेळी ग्रामस्थांनी घेतला. सुमारे दोन तास चाललेल्या या आंदोलनामध्ये अधिकारी व ग्रामस्थ यांच्यामध्ये अनेकदा चर्चेच्या फेरी झाले परंतु काम सुरू करण्याचे लेखी पत्र दिल्याशिवाय आम्ही पाण्यातून उठणार नाही असा पवित्र आंदोलकांनी घेतला. त्यामुळे हतबल झालेल्या प्रशासनाने भ्रमणध्वनी द्वारे वरिष्ठ व ठेकेदार यांच्याशी चर्चा केली. व २५ ऑगस्ट पर्यंत हा रोड रहदारी पूर्ववत करू असे लिखित आश्वासन प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे शेवगाव उप अभियंता संतोष पवार यांनी आंदोलकांना दिले. त्यानंतर आंदोलकांनी आपले आंदोलन मागे घेतले.

यावेळी वसंत मेरड, रामहरी साळूंके, देवीदास खरड, सचिन मेरड, उद्धव मेरड, गणेश दळे, सुधीर मेरड, सचिन मेरड, अशोक दळे, नारायण खंडागळे, ऋषीकेश मेरड, बाळासाहेब काळे, ज्ञानदेव खरड, संतोष मेरड, शेषराव आपशेटे, शंकर ओंबळे, बंटी वाघमारे व इतर ग्रामस्थांनी यावेळी या आंदोलनामध्ये सहभाग घेतला.

# बिंगो जुगारावर पोलिसांचा छापा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** शहरातील बिंगो ऑनलाईन जुगारावर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी छापा मारला. या ठिकाणी जुगार खेळवणारे व खेळणाऱ्या अशा १६ आरोपीं विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या ठिकाणाहून पोलिसांनी सुमारे ४ लाख ९८ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

शहरात बस स्टँड समोर, नवले कॉम्प्लेक्स मधील एका गाळ्यामध्ये काही लोक ऑनलाईन बिंगो, मटका व डॉलर नावाचा हार जितीचा जुगार खेळत व खेळवित असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पथकाने या ठिकाणी जुगार खेळाचा सुरू असल्याचे आढळून आले. जुगार खेळणाऱ्यांना पोलिसांनी शिताफीने पकडले.

नितीन निवृत्ती गायकवाड (रा. इंदिरानगर, अकोले), अमोल मारुती मोहिते (रा. इंदिरानगर, अकोले), वैभव राजेंद्र गायकवाड, (रा. कुंभारवाडा), व्हेल्सी गफुर वाघीलो (रा. शाहुनगर), अक्षय बाबासाहेब सकट (शिवाजीनगर), गोपी भाऊराव आवारी (रा. धामनगाव), अरबाज मोहम्मद शेख (रा. शिवाजी चौक), आकाश संजय परदेशी (रा. कुंभारवाडा), रमेश एकनाथ फापाळे (रा. लिंगदेव), अनिल बाळु पवार (रा. शाहुनगर), विकास दत्तात्रय आंबरे (रा. गणोरे), खंडु केरु सदगीर (रा. खिरवीरे), शंशीकांत मुरलीधर बेनके (रा. खिरवीरे), अशोक राजेंद्र जगताप (रा. शिवाजी महाराज चौक), गणेश हौसराव साबळे (रा. शनि मंदीरच्या पाठीमागे), अतुल जालींदर नवले (रा. अगस्ती आगार) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत.

# उसाच्या पेमेंटसाठीचे उपोषण सुरूच

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** कुकडी साखर कारखान्याकडून ऊसाचे थकलेले पेमेंटचे पैसे मिळावे, यासाठी १५ ऑगस्ट पासून तहसील कार्यालयासमोर सुरू केलेले बेमुदत उपोषण मंगळवारी पाचव्या दिवशीही सुरूच होते. मंगळवारी तहसीलदारांनी उपोषण सोडण्याचा प्रयत्न केला परंतु कुकडी कडून ठोस प्रतिसाद मिळाला नाही. आता कुकडी विरोधात गुन्हे दाखल करणार असल्याचे उपोषणकर्ते व सहकारी शेतकऱ्यांनी सांगितले.

दरम्यान तहसीलदार डॉ. संजय बिराजदार यांनी कुकडी कारखान्याचे प्रतिनिधी यांच्यात ऊस पेमेंट करिता समेट घडविण्याचा शर्थीचा प्रयत्न केला. परंतु उपयोग झाला नसल्याने कुकडी कारखान्याविरोधात शेतकऱ्यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या. उपोषणकर्ते संजय नागोडे व मच्छिंद्र गवळी यांची शहरातील प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. सिद्दीक शेख यांनी मंगळवारी तपासणी केल्यानंतर त्यांची प्रकृती खालावली असल्याचे सांगण्यात आले.

# संग्राम बापू यांच्यावर गुन्हा दाखल करा

## सामाजिक संघटनांच्यावतीने पोलिसांना निवेदन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** तालुक्यातील घुलेवाडी येथील अखंड हरिनाम सप्ताहातील किर्तनात संग्राम बापू भंडारे यांनी धर्मकार्य, धर्मप्रचार या नावाखाली सर्वधर्म समभाव धर्मनिरपेक्षता या घटनेतील संविधानिक मूल्यांची अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन टीकाटिप्पणी केली. त्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी संगमनेर येथील सामाजिक संघटनांनी प्रांताधिकारी तसेच पोलिसांना निवेदनाद्वारे केली आहे.



घुलेवाडी या ठिकाणी सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये १६ ऑगस्ट २०२५ रोजी संग्राम बापू भंडारे यांचे कीर्तन आयोजित करण्यात आलेले होते. यामध्ये त्यांनी चितवाणीखोर टिपण्णी केली. यास येथील उपस्थितांनी त्यांना विरोध दर्शविल्यानंतर सबंधितांवर गुन्हे दाखल केले. या गुन्ह्यांमध्ये न घडलेल्या गोष्टीच्या कहाण्या तयार करून खोटे गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत अशा प्रकारे खोटे गुन्हे दाखल करून घेऊन एक प्रकारची दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. पोलीस प्रशासनाने कोणत्याही खोट्या गुन्ह्यांना प्राधान्य न देता घडलेली गोष्टीची शहानिशा करून व समाजामध्ये द्वेष पसरणार नाही भीती पसरणार नाही व वाईट गोष्टीला प्रोत्साहन मिळणार नाही अशा प्रकारची चौकशी करून ज्यांनी खोटे गुन्हे दाखल केलेले आहेत त्यांच्यावरच कारवाई करणे आवश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

### निवेदन देतेवेळी यांची होती उपस्थिती

राष्ट्रसेवादलाचे माजी कार्यध्यक्ष राजाभाऊ अवसक, ‘अंनिस’च्या माजी कार्यध्यक्ष ॲड. रंजना गवांदे, विठ्ठल शेवाळे, जयसिंग सहाने, माजी राष्ट्रसेवादल अध्यक्ष समीर लामखडे, वंचित बहुजन आघाडी पक्षाचे अजीजभाई ओहरा, श्रीनिवास पगडाल, छात्रभारती विद्यार्थी संघटनेचे अनिकेत घुले, रजत अवसक, संभाजी ब्रिगेडचे राम अरगडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक ‘जनता आवाज’, मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, ✲ कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11